मराठी

# आंतरभारती

इयत्ता दहावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्‌दल दयाबुद्‌धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# आंतरभारती

## इयत्ता दहावी

### (संयुक्त भाषा)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

ACKSF5

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८
चौथे पुनर्मुद्रण : २०२२

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. मोहन शिरसाट
श्री. प्रवीण खैरे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
श्री. देविदास तारू
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
डॉ. सुभाष राठोड
श्री. नाना लहाने
श्रीमती प्रतिभा लोखंडे
श्रीमती जयमाला मुळीक
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती स्मिता जोशी
श्रीमती नेहा रावते
श्रीमती अन्वया काणे
श्रीमती सुप्रिया खाडिलकर
श्री. सुनिल बनसोडे
डॉ. जगदीश पाटील
श्री. रमाकांत देशपांडे
श्री. नामदेव एडके
श्री. रविंद्रदादा डोंगरदेव
श्री. दिलीप देशपांडे

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
**चित्रकार** : यशवंत देशमुख
**मुखपृष्ठ** : यशवंत देशमुख
**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** :
**मुद्रक** :

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता दहावीचे 'आंतरभारती' मराठी हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

मित्रांनो! तुम्हांला मराठीतून एकमेकांशी चांगल्या प्रकारे संवाद साधता यायला हवा. आपले विचार, भावना, कल्पना लेखनातून अभिव्यक्त करता यायला हव्यात. यासाठी मराठी भाषा चांगल्या प्रकारे शिकून उत्तम प्रकारे वापरता यायला हवी, हे विचारात घेऊन या पाठ्यपुस्तकातील पाठांची, स्वाध्यायांची योजना केलेली आहे.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला क्षमतांची यादी दिलेली आहे. त्यावरून कोणती भाषिक कौशल्ये आत्मसात करायची आहेत याची तुम्हांला कल्पना येऊ शकेल.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यावर तुमच्या लक्षात येईल, की त्यामध्ये विविध साहित्यप्रकारांचा समावेश केलेला आहे. गद्य पाठांमध्ये कथा, ललित, विनोदी शैलीतील पाठ, विज्ञान विषयावरील पाठ इत्यादी प्रकारच्या पाठांचा समावेश आहे. तसेच पद्य पाठांमध्ये संतवाणी, प्रार्थना, देशभक्तीपर समूहगीत, निसर्गवर्णनपर कविता, लोकगीत इत्यादी काव्यप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व पाठांमधील आशय आणि भाषा यांमधील वैविध्य तुम्हांला नक्कीच आवडेल.

या पाठ्यपुस्तकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठाखालील स्वाध्यायांचे स्वरूप आणि रचना वैविध्य. हे स्वाध्याय तुम्हांला पाठांचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या हेतूने स्वाध्यायांतील कृतींची रचना जाणीवपूर्वक केली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचे स्वयंअध्ययन यांमधून भाषा शिकताना तुम्हांला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही. पाठांतराचे दडपणही राहणार नाही.

दैनंदिन व्यवहारात आपणाला पावलोपावली मराठी भाषेचा वापर करावा लागतो. त्या दृष्टीने तुमची उत्तम तयारी व्हावी यासाठी या पाठ्यपुस्तकातील उपयोजित लेखनाचा सराव उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर रोजच्या व्यवहारांमध्ये तुम्हांला तंत्रज्ञानाचाही वापर करायचा आहे. त्यासाठी पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवण्यासाठी संकेतस्थळांची यादीही दिलेली आहे. प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्‌वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणारे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, असा विश्वास आहे.

(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ मार्च २०१८, गुढीपाडवा
भारतीय सौर दिनांक : २७ फाल्गुन १९३९

# भाषाविषयक क्षमता : संयुक्त भाषा मराठी

**इयत्ता दहावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
| --- | --- |
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद यांबाबत स्वत:चे मत निश्चित करता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील ऐकलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. विविध साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांतील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण निर्माण होणे.<br>६. विविध साहित्यप्रकार ऐकून त्यांबाबत मत ठरवता येणे. |
| भाषण-संभाषण | १. विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२. विषयानुरूप स्वत:चे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन, आयोजन करून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. भाषण-संभाषण कौशल्यातील बारकावे समजून घेऊन त्यांचा योग्य वापर करता येणे.<br>५. प्रसंगानुरूप समोरील व्यक्तीशी संवाद साधून स्वत:चे मत प्रभावीपणे मांडता येणे. |
| वाचन | १. योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>२. विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>३. वाचलेल्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश व त्यातील विचार समजून घेता येणे.<br>४. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करून, त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>५. सार्वजनिक ठिकाणावरील सूचना व माहिती चिकित्सकपणे वाचून त्याबाबत योग्य विचार करता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचा वापर करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचे लेखन करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह, आलंकारिक शब्द, सुभाषिते यांचा लेखनात वापर करता येणे.<br>५. सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे तुलनात्मक लेखन करता येणे.<br>७. ऐकलेल्या, अनुभवलेल्या माहितीचे स्वत:च्या शब्दांत लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

अध्ययन कौशल्य

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. दिलेल्या विषयाचा सखोल अभ्यास करून स्वमत मांडता येणे.
३. घटना, प्रसंग, कार्यक्रम यांबाबत अभिप्राय मांडता येणे.
४. शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी यांचा लेखनात व भाषण-संभाषणात वापर करता येणे.
५. आंतरजालाचा वापर करून ऑनलाइन व्यवहार करता येणे. तसेच सोशल मीडियाचा योग्य वापर करता येणे.
६. संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा अभ्यासासाठी वापर करता येणे.
७. प्रसारमाध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, त्याबाबत चिकित्सक विचार करता येणे.
८. विविध सामाजिक समस्यांबाबत आपले मत परखडपणे मांडता येणे.

भाषाभ्यास

१. इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.
- लिंग, वचन, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, विरामचिन्हे, प्रत्यय, उपसर्ग, वाक्प्रचार, म्हणी, शब्दांच्या जाती, काळ, सामान्यरूप, अव्ययीभाव व द्वंद्व समास, अनुप्रास व यमक अलंकार, लेखनविषयक नियम, शब्दसंपत्तीशी संबंधित कृती या व्याकरण घटकांची उजळणी करणे.

## शिक्षकांसाठी

मराठी आंतरभारती इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, गीते, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या क्षमता विधानांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील विविध कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करवून घेणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी घेण्यासाठी विविध कृती योजलेल्या आहेत. या व्याकरण घटकांची मनोरंजक व सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला जाणार आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये विकसित होणार आहेत. त्याचबरोबर त्यांच्यातील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. इयत्ता दहावीतील उपयोजित घटकांची मांडणी इयत्ता नववीतील उपयोजित घटकांचा विचार करून केल्याने शिक्षकांनी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचाही आढावा घ्यावा.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठांतील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

मराठी आंतरभारती (संयुक्त भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | तू सर्व जगाचा त्राता रे (प्रार्थना)<br>– चारुता प्रभुदेसाई | १ |
| २. | संतवाणी–<br>(अ) शेखमहंमद सांगती सेव–संत शेख महंमद<br>(आ) जें कां रंजलें गांजलें–संत तुकाराम | २ |
| ३. | अनाथांची आई<br>– सिंधुताई सपकाळ | ६ |
| ४. | चिल्ड्रन ऑफ हेवन<br>– रेणू गावस्कर | ९ |
| ५. | खोप्यामधी खोपा (कविता)<br>– बहिणाबाई चौधरी | १२ |
| ६. | मकबरा–माझ्या मनातला!<br>– डॉ. यू. म. पठाण | १४ |
| ७. | बदलणं म्हणजे...<br>– मल्हार अरणकल्ले | १८ |




## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ८. | सायंकाळची शोभा (कविता)<br>– भा. रा. तांबे | २२ |
| ९. | तरफ<br>– सुरेश मथुरे | २४ |
| १०. | डासपीटिका<br>– अनिल अवचट | २८ |
| ११. | हा देश माझा (कविता)<br>– सेनापती बापट | ३१ |
| १२. | मोर<br>– पां. पि. घरत | ३३ |
| १३. | मॉरिशस : सागरदर्यातले साखरबेट<br>– दत्ता नायक | ३७ |
| १४. | भल्लगडी दादा (कविता)<br>– शाहीर कुंदन कांबळे | ४० |
| ❁ | उपयोजित लेखन | ४२ |




# १. तू सर्व जगाचा त्राता रे

**चारुता प्रभुदेसाई** (१९६७) :

शिक्षिका, लेखिका व कवयित्री. 'किशोर', 'शिक्षणसंक्रमण', 'छात्रप्रबोधन', 'शिक्षणविवेक' या मासिकांमधून लेखन. आकाशवाणी, दूरचित्रवाणी कार्यक्रमांत सहभाग व लेखन. तसेच विविध वृत्तपत्रांतून प्रासंगिक लेखन. आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षिका. त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांद्वारे आयोजित शैक्षणिक कार्यक्रमांमधून सहभाग घेतलेला आहे व अनेक शैक्षणिक उपक्रम केले आहेत.

सर्व कलांमध्ये ज्याचा वास आहे अशा चराचरामध्ये वसलेल्या निराकाराची केलेली ही प्रार्थना. सर्व जगाचे कल्याण व्हावे, सर्व विश्वात शांती नांदावी, निर्भयता यावी असे मागणे प्रस्तुत कवितेत कवयित्रीने मागितले आहे.

तू सर्व जगाचा त्राता रे
तू कला बुद्धिचा दाता रे
जाहलो लीन अम्ही तव चरणी
तू अमुचा भाग्यविधाता रे ।।धृ।।

नटराज नर्तनी दिसशी तू
गायनी सुरांचा ईश्वर तू
उधळिले रंग तू नभांगणी
तू दया शांति निर्माता रे ।।१।।

वरदान तुझे आम्हा द्यावे
कल्याणदायी सर्वा व्हावे
वसशील आमुच्या नित्य मनी
तव कृपा छत्र धरि आता रे ।।२।।

दे शक्ति अम्हा संकटसमयी
निर्भयता वसुदे या हृदयी
प्रार्थना हीच अंतर्यामी
तुजला विश्वाच्या नाथा रे ।।३।।



**शब्दार्थ :**
**त्राता** – तारणारा. **दाता** – देणारा. **लीन** – नम्र. **नभांगणी** – आकाशाच्या अंगणात. **छत्र** – सावली.

**प्रस्तुत प्रार्थना ही काव्यानंदासाठी घेतली असून, ती विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावी.**

# २. संतवाणी

## (अ) शेखमहंमद सांगती सेव

**संत शेख महंमद** (सतरावे शतक) :

संतकवी. संत शेख महंमद यांनी मराठी, हिंदी, उर्दू, फारसी या भाषांत काव्यरचना केली. रूपके, भारूडं, अभंग इत्यादी सुमारे ३०० स्फुट कविता त्यांनी लिहिल्या आहेत. 'योगसंग्राम', 'पवनविजय' व 'निष्कलंकप्रबोध' या त्यांच्या मराठीतील प्रमुख ओवीबद्ध रचना आहेत.

प्रस्तुत अभंगात साधूच्या अंतरंगाचे दर्शन घडवले आहे. तसेच साधुत्व ओळखण्याचे निकष विविध दृष्टान्तातून स्पष्ट केले आहेत.

*केकतीला कांट्याचे वेढे ।*
*भितरीं निपजती केवडे ।*
*तैसे साधूचे शब्द गाढे ।*
*परोपकारालागीं ।।*

*फणस सर्वांगीं कांटवले ।*
*भितरीं महा गोडीनें कोंदले ।*
*तैसें साधुहृदय जालें ।*
*बोधासंगें परियेसा ।।*

*नारळ कठीण दिसे बाहेर ।*
*भितरीं खोबरें अरुवार ।*
*तैसें साधूचें अंतर ।*
*बोधें वोसंडले ।।*

*ऐसा सद्‌गुरुशीं धरा भाव ।*
*तो कैसा करावा उपाव ।*
*शेखमहंमद सांगती सेव ।*
*सभे श्रोत्यांप्रती ।।*

**शब्दार्थ :**

**केकती** – केवड्याचे झाड, केतकी. **निपजणे** – उत्पन्न होणे, पैदा होणे. **गाढे** – कळकळीचे, भक्तीने युक्त. **कांटवले** – काटेरी. **परियेसा** – ऐका. **अरुवार** – मृदू, कोमल. **वोसंडणे** – ओसंडणे. **उपाव** – उपाय.

## कृती

**(१) खालील आकृती पूर्ण करा.**

अभंगात उल्लेखलेली फुले व फळे

**(२) एका वाक्यात उत्तर लिहा.**

संत शेख महंमद यांनी केलेला उपदेश

**(३) वैशिष्ट्ये शोधून खालील तक्ता पूर्ण करा.**

| अभंगात उल्लेखलेल्या गोष्टी/व्यक्ती | बाह्यरंग | अंतरंग |
|---|---|---|
| (१) केकती | | |
| (२) फणस | | |
| (३) नारळ | | |
| (४) संत | | |

**(४) स्वमत.**

(१) अभंगाच्या आधारे साधुत्व ओळखण्याचे निकष सांगा.

(२) 'सद्गुरूंचे शब्द कठोर असले, तरी त्यांचे अंत:करण कोमल असते.' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

**उपक्रम :** संत नामदेव यांचे पाच अभंग मिळवून त्यांचे वर्गात वाचन करा.

***

AD4JIF

## संतवाणी

# (आ) जें कां रंजलें गांजलें

**संत तुकाराम** (१६०८ ते १६५०) :

वारकरी परंपरेतील महत्त्वाचे संतकवी. त्यांच्या रचनांमध्ये भक्ती, व्यवहार आणि अध्यात्म यांची सांगड घातलेली दिसते. ढोंग, दैववाद, अहंकारी वृत्ती, दुराचार इत्यादींचा परखड समाचार त्यांनी आपल्या अभंगांमधून घेतलेला आहे. प्रेम, नैतिकता, करुणा व सर्वांमध्ये ईश्वराचे अस्तित्व ही मूल्ये स्वीकारून आदर्श प्रापंचिक जीवन कसे जगावे, याचा उपदेश ते आपल्या अभंगातून करतात. त्यांच्या अभंगातील ओळींना सुभाषितांचे मोल प्राप्त झाले आहे.

प्रस्तुत अभंगात संत तुकाराम महाराज यांनी साधूची लक्षणे सांगितली आहेत.

*जें कां रंजलें गांजलें ।*
*त्यासि म्हणे जो आपुलें ।।१।।*

*तो चि साधु ओळखावा ।*
*देव तेथें चि जाणावा ।।२।।*

*मृदु सबाह्य नवनीत ।*
*तैसें सज्जनाचें चित्त ।।३।।*

*ज्यासि आपंगिता नाहीं ।*
*त्यासि धरी जो हृदयीं ।।४।।*

*दया करणें जें पुत्रासी ।*
*ते चि दासा आणि दासी ।।५।।*

*तुका म्हणे सांगू किती ।*
*तो चि भगवंताची मूर्ती ।।६।।*

श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा
(शासकीय प्रत, अभंग क्र.३४७)

**शब्दार्थ :**
**रंजलें गांजलें** – दु:खीकष्टी झालेले. **सबाह्य** – आतून बाहेरून. **नवनीत** – लोणी. **आपंगिता** – आश्रयदाता.

## कृती

### (१) योग्य पर्याय निवडा.

(१) साधू म्हणजे अशी व्यक्ती जी ........

(अ) रात्रंदिवस ध्यान करते.

(आ) रात्रंदिवस भजन करते.

(इ) दु:खीकष्टी लोकांना आपले समजते.

(ई) रात्रंदिवस भक्ती करते.

(२) परमेश्वराचे अस्तित्व ............ बघावे.

(अ) जे फक्त सज्जन समजले जातात त्यांच्यामध्ये

(आ) रंजल्या गांजल्यांना आपलेसे करणाऱ्यांमध्ये

(इ) समाजासाठी भजन-पूजन करणाऱ्यांमध्ये

(ई) एकांतात तपश्चर्या करणाऱ्यांमध्ये

### (२) खालील आकृती पूर्ण करा.

संत तुकाराम महाराज यांनी सांगितलेली साधूची लक्षणे

### (३) उत्तरे लिहा.

(अ) साधू ज्यांना हृदयी धरतात ते-

(आ) साधू ज्यांच्यावर पुत्रवत प्रेम करतात त्या व्यक्ती-

(इ) नवनीताप्रमाणे मऊ असणारे-

(ई) संत तुकाराम महाराज यांच्या मते भगवंत ज्यांच्यामध्ये वास करतो ती व्यक्ती-

### (४) स्वमत.

(अ) 'मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ।।' या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) साधू कोणाकोणाला कशी कशी मदत करतात, ते कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

(इ) कोणत्याही व्यक्तीतील साधुत्व ओळखण्यासाठी खालीलपैकी कोणता घटक तुम्हांला महत्वाचा वाटतो, ते स्पष्ट करा.

(१) त्याची देवभक्ती (२) त्याची तपश्चर्या (३) त्याचे सामाजिक कार्य

**उपक्रम :** संत तुकाराम महाराज यांचे चरित्र मिळवून वाचा.

***

# ३. अनाथांची आई

**सिंधुताई सपकाळ** (१९४८) :

अनाथांची सेवा करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या. 'ममता बालसदन' या संस्थेची स्थापना करून अनाथ मुलांचा सांभाळ करण्याचे समाजकार्य त्या करत आहेत. त्यांनी अनेक अनाथ मुलांच्या शिक्षणाची सोय केली, त्यांना जगण्याची प्रेरणा दिली आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजात मानाचे स्थान मिळवून दिले.

'मी वनवासी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांना 'अहिल्याबाई होळकर', 'सावित्रीबाई फुले' या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. तसेच 'सत्पाल मित्तल नॅशनल ॲवॉर्ड' व 'फाय फाउंडेशन' यांचेही त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या जीवनावर आधारित 'मी सिंधुताई सपकाळ' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. सिंधुताई या लयबद्ध वक्तृत्वासाठी प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत पाठात लेखिकेची प्रतिकूल परिस्थितीतही शिकण्याची प्रचंड जिद्द दिसून येते.

मी सिंधुताई सपकाळ!



मला लहानपणी सगळेजण 'चिंधी' म्हणत. चिंधी अभिमान साठे. माझा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी नवरगाव फॉरेस्ट येथे झाला. माझ्या वडिलांना 'अण्याजी' म्हणायचे. आमचं घर छोटंसं; पण छान होतं. अंगणात गुरं, गाई-म्हशी होत्या.

मी रोज म्हशी घेऊन शाळेसमोरून जात असे. त्या शाळेचं नाव होतं, 'बुनियादी ग्रामशाळा पिंपरी (मेघे), आर्वी रोड, जि. वर्धा'. शाळा म्हणजे एक भला मोठा हॉल होता. धान्य ठेवायला गोडाऊन बांधतात तसा, वर कौलं असलेला. समोर एक छान भलंमोठं चाफ्याचं झाड होतं. त्याची टपोरी, पांढरीशुभ्र फुलं शाळेच्या अंगणात पडलेली असायची. म्हशी घेऊन जाताना शाळेपाशी आले, की मी म्हशी घेऊन शाळेपुढे थांबत असे. शाळेत जाणाऱ्या मुली चांगले कपडे घालून, वेणी-फणी करून शाळेसमोर खेळत असायच्या. काहीजणी झाडाखाली बसून अभ्यास करत असायच्या. तेव्हा मला वाटायचं..'आपणपण शाळेत जावं.' मी एकदा अण्याजींना म्हटलं, ''अण्याजी, मला शाळेत जाऊन शाळा शिकायचीय.'' चुलीपुढं बसून भाकरी करणाऱ्या आईनं हे ऐकलं अन् ती तरातरा बाहेर आली. ''चिंधे, काय म्हणालीस?... शाळेत जायाचं.. अन् रोज म्हशी कोण सांभाळील? आपल्या साठेच्या घराण्यात अजून कुणी शाळेची पायरीसुद्धा चढलं नाही..अन् शाळेत जायचं म्हणती शहाणी!'' अण्याजी आईचं ऐकत होते; पण काहीच बोलत नव्हते. मी रडायला लागले; पण माझं कोणी ऐकत नव्हतं. माझे वडील म्हणाले, ''गप्प बस.'' त्यांना कुणी रडलेलं आवडत नसे. माझे वडील अभिमान साठे. नावाप्रमाणेच अभिमान वाटावा असे ते होते. दुसरे दिवशी ते मला शाळेत घेऊन गेले. त्यांनी माझं नाव शाळेत घातलं.

वयाच्या नवव्या वर्षी मी या शाळेत गेले. गावातलेच वांदिले गुरुजी मुख्याध्यापक होते. पांढरेशुभ्र धोतर, त्यावर नेहरू शर्ट व डोक्यावर पांढरी टोपी असा त्यांचा पोशाख होता. वडिलांनी माहिती सांगितली. वांदिले गुरुजींनी माहिती लिहिली. अण्याजींचा त्यावर अंगठा घेतला आणि माझी शाळा सुरू झाली. शाळेत नाव घातलं, तरी म्हशी सांभाळायला जावंच लागायचं. सकाळी शाळा भरायच्या वेळी मला घंटा ऐकू येत असे. मला शाळेत जावंसं वाटायचं; पण जाता येत नसे. सकाळी ७ ते १ वाजेपर्यंत व नंतर ३ ते ५.३० पर्यंत अशी दोन वेळा शाळा भरायची. सकाळची शाळा मला सापडत नसे. म्हशी चारायला गेलं, की शाळेजवळ खालच्या बाजूला जो छोटा डोह होता, त्यात म्हशी डुंबत बसत. मग मी तास दोन तास निवांत होत असे, तेव्हा शाळेचा राहिलेला अर्धा वेळ मी पाटीचा फुटका तुकडा आणि फाटकं पुस्तक घेऊन शाळेत जात असे. शाळा भरलेलीच असे. काही मुलं मोठमोठ्याने एक-दोन असे पाढे सुरात म्हणत असायची. तिसरी आणि चौथीला वांदिले गुरुजी शिकवत, तर पहिली-दुसरीला कांबळे गुरुजी शिकवत. चार कोपऱ्यांत चार वर्ग अशी रचना असे.

मी वर्गात गेले, की मुलं-मुली म्हणत, ''गुरुजी, चिंधी आत्ता शाळेत आली बघा.'' वांदिले गुरुजी माझ्याकडे रागाने बघत; पण कांबळे गुरुजींचे आश्वासक डोळे मला न बोलता सांगत, ''ये, बस वर्गात.''

माझ्यावर त्यांनी खूप माया केली. मी शाळेत उशिरा गेले तरी ते रागवत नसत. त्यांची उबदार माया नसती, तर मी जी

थोडीफार शिकले तेवढीही शाळा शिकू शकले नसते. आयुष्याच्या वैराण वाळवंटात जशी सावली असावी, तशी मला गुरुजींची माया वाटायची. गुरुजी पाटीवर 'ग' 'म' असं लिहून देत. परत परत लिहायला सांगत. ते विचारत ''तू जेवलीस का?'' मला काय बोलावं ते कळत नसे.

शाळेची घंटा झाली, की सर्व मुले-मुली जेवायला बसत. मी त्यांच्या तोंडाकडे बघत बसे. पोटात भूक लागलेली असे. मुले-मुली जेवण करून खेळायला गेल्या, की मी लाडूचा तुकडा, भुरका, गुळाचा खडा, जिलेबीचा तुकडा मातीतून फुलात उचलून ठेवत असे. सर्वांना वाटायचं, मी चाफ्याची फुलंच गोळा करते; पण त्या फुलातला माती लागलेला तो अन्नाचा कण चाफ्याच्या सुगंधाने चवदार व गोड लागायचा. त्यावर घोटभर पाणी पिऊन मी वर्गात बसायची.

कधी कधी म्हशींमुळे दिवस दिवस शाळेत जाता येत नसे. आमच्या चिखलदऱ्यात भराडी नावाची एक वनस्पती येते. चांगलं तळहाताएवढं मोठं पान असतं. त्याला खाली एक काटा असतो. त्या भराडीचा काटा हे माझं पेन व भराडीचं पान हा माझा कागद असे. म्हशीमागे जात जात अ, आ, इ, ई, उ, ऊ अशी अक्षरं लिहिणं मी शिकू लागले. असं निसर्गाच्या सोबतीनं लिहिलं, म्हणून शिकलेलं कधीच विसरता नाही आलं.

अशी 'हाफ टाईम शाळा' करीत करीत मी चौथीपर्यंत आले. गोपुरीला केंद्रशाळा का काय होती. तिथे चौथीची परीक्षा होती. मी पास झाले. शाळेत रिझल्ट आणायला गेले, तर वांदिले गुरुजी म्हणाले, ''चिंधे, तू पास झालीस. आता चिंधी नावाची चिमणी उडून जाणार.''

मी तो कागद घेऊन बाहेर पडले; पण पुन्हा वळून वळून शाळेकडे पाहत होते. त्या भिंतीवर चुन्यानं लिहिलेली, 'बुनियादी ग्रामशाळा पिंपरी (मेघे)', ही अक्षरं पुसट पुसट होत होती. त्यावरची शाई आसवांच्या त्या पाण्यात कागदभर पसरत होती. अशी माझी शाळा...

माझं लग्न झाल्यावर सासरी माझा छळ होण्याची जी कारणं आहेत, त्यांपैकी एक कारण म्हणजे माझी शुद्ध भाषा! दुसरं कारण माझं वाचन! माझ्या सासरी शिक्षणाचा गंधही नव्हता. सासरचे लोक अशिक्षित, अक्षरशत्रूच. त्यांना काहीही वाचता येत नसल्यामुळे त्यांच्यासमोर मी वाचायला कागद हातात घेतला, की त्यांच्या कपाळाला आठ्या पडायच्या.

पुढे पुढे मी चोरून वाचायला लागले. वाणसामानाचे कागद चोळामोळा करून उंदीर-घुशीच्या बिळात ठेवायला लागले. एकदा गदिमांची एक कविता छापलेला एक कागद सापडला.

**माऊलीच्या दुग्धापरी आले मृगाचे तुषार ।**
**भुकेजल्या तान्ह्यासम तोंड पसरी शिवार ।।**

मी वाचनाची भुकेली होतेच. गदिमांच्या या ओळी मला भुरळ घालत होत्या. त्या दिवशी घरात बरीच गर्दी होती. त्यामुळे घरापासून दूर जाऊन एका मोठ्या दरात (बिळात) तो कागद ठेवला, मात्र हाताला मुंगूस चावला.

कवितेतील मृगाच्या तुषारांवर माझ्या रक्ताची धार सुरू झाली. जणू माझ्या अडचणींवर माझ्या ज्ञानतृषेचा अभिषेक झाला. मला वाचनाची इतकी आतून ओढ का असावी? मी प्रवाहाच्या उलट वाहत असल्यामुळे मला हा त्रास होत होता. मी प्रवाहात झोकून दिलं नाही स्वत:ला. मला सापडलेली शिक्षणाची अनोखी पाऊलवाट ठेचकाळत, रक्तबंबाळ होत मी चालत राहिले.

एका रात्री घरच्यांनी घराबाहेर काढलं. गावाबाहेर पाठवून दिलं. मी एकटी बाई, जवळ एक लहान, तान्हे बाळ. मी खऱ्या अर्थाने तेव्हा अनाथ झाले होते; पण माझ्यातली स्त्रीशक्ती जागृत झाली. मी अनाथ झाले, तरी रडून चालणार नव्हतं. काय करावं ते मला कळत नव्हतं; पण निश्चयानं ठरवलं. निर्धार केला. आपण अनाथ राहायचं नाही. स्वनाथ व्हायचं! जणू पुढे मला अनेक अनाथांची आई व्हायचं होतं.

**(आठवणीतील शाळा आणि शिक्षक)**

**शब्दार्थ :**

**आश्वासक** – विश्वास देणारा, खात्री देणारा. **वैराण** – उजाड. **अक्षरशत्रू** – निरक्षर. **वाणसामान** – किराणा. **भुरळ घालणे** – आकर्षित करणे. **ज्ञानतृषा** – ज्ञान मिळवण्याची तीव्र इच्छा.

## कृती

### (१) योग्य पर्याय निवडा.

(१) चिंधीला शाळा शिकण्यास मनाई होती, कारण....

(अ) चिंधी घरात सर्वांत मोठी होती.

(आ) त्यांच्या घरातील कुणीही यापूर्वी शाळेची पायरी चढले नव्हते.

(इ) ती आईबाबांची लाडकी होती.

(२) चिंधीने कविता छापलेला कागद बिळात लपवून ठेवला, कारण....

(अ) चिंधीला छापील कागद आवडायचे.

(आ) सासरच्या लोकांना तिचे वाचन आवडत नसे.

(इ) बिळातून उंदीर-घुशी बाहेर पडू नयेत म्हणून.

### (२) उत्तरे लिहा.

(अ) बुनियादी ग्रामशाळेतील शिक्षकांची नावे.

(आ) चिंधी लहानपणी कागद-पेन म्हणून वापर करत होती ती वनस्पती.

### (३) खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.

(अ) अक्षरे ज्याची शत्रू आहेत, असा-

(आ) ज्ञानाची तहान-

### (४) गटांतील वेगळा शब्द ओळखा व तो शब्द वेगळा का आहे, यामागील कारण स्पष्ट करा.

(अ) रमेश, जोसेफ, यास्मिन, आम्ही

(आ) ते, तुला, आणि, आम्ही

(इ) तनुजा, समीर, सुंदर, राधिका

(ई) त्याला, मला, करणे, तुम्हांला

### (५) खालील शब्दांतील अक्षरांवरून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

उदा., संग्रहालयात – हाल, यात, हात, संत.

(अ) ग्रामशाळेतील (आ) उपकारक (इ) पक्षिसंरक्षणविषयक (ई) वजनदार

### (६) स्वमत.

(१) लेखिकेने कांबळे गुरुजींबद्दल व्यक्त केलेली भावना तुमच्या शब्दांत लिहा.

(२) सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती, हे पाठाच्या आधारे पटवून द्या.

**उपक्रम :**

(१) तुमच्या परिसरात असणाऱ्या एखाद्या अनाथ आश्रमास भेट देऊन त्याबाबत माहिती मिळवा.

(२) आंतरजालावर उपलब्ध असणारी सिंधुताई सपकाळ यांची भाषणे मिळवा व ऐका.

ADDFK3

***

## ४. चिल्ड्रन ऑफ हेवन

**रेणू गावस्कर** (१९५३) :

प्रसिद्ध लेखिका आणि समाजसेविका. 'आम्ही युवा' या न्यासाच्या अध्यक्षा, तसेच मुलांचे भवितव्य घडवणाऱ्या एकलव्य न्यासाच्याही त्या प्रमुख आहेत. 'अफलातून गोष्टी', 'हरवले ते गवसले', 'आमचा काय गुन्हा ?', 'गोष्टी जन्मांतरीच्या', 'मालक नको पालक व्हा', 'नि:शब्द झुंज' हे त्यांचे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत पाठात लहानग्या जहिराला बूट मिळवून देण्याची अलीची धडपड दिसून येते. तसेच त्यात त्याला आलेले अपयश मनाला चटका लावून जाते. गरीब कुटुंबातील अली आणि जहिरा या भावंडांच्या निरागस प्रेमाचे चित्रण या पाठात केले आहे.

'चिल्ड्रन ऑफ हेवन' ही चित्रपटकथा आहे अली आणि जहिरा या दोन भावंडांची.

एका अतिशय गरीब घरातली पाठीला पाठ लावून आलेली ही भावंडं. मोठा अली तिसऱ्या इयत्तेत शिकतोय तर जहिरा नुकतीच पहिलीत गेली आहे. मुळात हातावरचं पोट असलेल्या घरातील गृहिणीला-जहिराच्या आईला असं दुखणं जडलंय, की घरात येणाऱ्या तुटपुंज्या रकमेतले बरेचसे पैसे औषधपाण्यात जाताहेत. पुन्हा आई सतत आजारी असल्यानं या दोनही मुलांना घरच्या, बाहेरच्या कामाची आघाडी सांभाळावी लागतेय ते वेगळंच. आणखी एक सांगायचं राहिलं ते म्हणजे जहिरा, अलीला एक तान्हुलं भावंडं आहे.

मात्र अशी प्रतिकूलता असली, तरी हे कुटुंब मोठ्या आनंदात आहे. खास करून अली आणि जहिराची अगदी गट्टी आहे. एकमेकांवर मनापासून प्रेम करणारी ही भावंडं काही पथ्यं कटाक्षानं पाळतात, म्हणजे असं की आपसातली भांडणं ती कधीच आपल्या आईबाबांपर्यंत नेत नाहीत.

इथपर्यंत चित्रपट संथगतीनं पुढं जातो; पण नंतर मात्र या भावंडांच्या आयुष्यात अशी एक घटना घडते, की त्यामुळं त्यांचं सारं आयुष्यच बदलून जातं.

होतं असं, की जहिराचे बूट अगदी जुने, जीर्ण झालेले असतात; पण जहिराला शाळेत बूट घालून जाणं अनिवार्य असल्यामुळं, अली तेच बूट पुन्हा एकदा शिवायला घेऊन जातो. त्याच वेळी आईनं उधारीवर भाजी आणायला सांगितल्यानं जहिराचे बूट दुकानाच्या दर्शनी भागातल्या एका खोबणीत ठेवून अली आत जातो. उधारीवर कांदे, बटाटे मागितल्यानं अलीला अर्थातच दुकानदाराची बोलणी खावी लागतात. बाहेर येतो तर बूट गायब झालेले असतात. कचरा गोळा करणारे लोक ते 'टाकाऊ' बूट गाडीत टाकून देतात.

अलीला कमालीचा धक्का बसतो. घरी आल्यावर घडलेली सर्व हकिकत तो जहिराला सांगतो. आता बूटच नसल्यानं जहिरानं शाळेत जायचं कसं, हा यक्षप्रश्न दोघा भावंडांपुढे उभा राहतो. पुन्हा आईवडिलांपाशी यातलं काहीच सांगायची सोय नसते. त्यांच्यापाशी पैसे नसल्यानं त्यांना बूट तर घेऊन देता येणार नाहीतच व त्याचं त्यांना दु:ख होईल, अशी भीतीही दोघांना वाटत असते.

दोघं खूप विचार करतात. शेवटी अली या संकटातून मार्ग काढतो. जहिराची शाळा सकाळची आहे, तर अलीची दुपारची आहे. जहिरानं सकाळी अलीचे बूट घालून जावेत व दुपारी धावत येऊन अलीला ते बूट द्यावेत व अलीनं ते बूट घालून शाळेला धावत सुटावं असं ठरतं.

अलीच्या सुपीक डोक्यातून निघालेला हा काहीसा वेगळाच तोडगा निभावताना, या भावंडांना रोज नव्या संकटाला सामोरं जावं लागतं. रोज शाळा सुटल्यावर जहिरा कितीही जीव तोडून घरी पळत सुटली, तरी ती अलीला वेळेत बूट आणून देऊ शकत नाही. परिणामी अलीला शाळेत पोहोचायला रोजच उशीर व्हायला लागतो. इतका की हेडमास्तर या पहिल्या नंबराच्या मुलाला शाळेत येण्याचीच बंदी करतात. अलीवर मनापासून प्रेम करणाऱ्या, एका शिक्षकाच्या मदतीनं त्याची या संकटातून सुटका होते हा भाग वेगळा. जहिरालाही बूट मोठे होत असल्याने ते पायांतून सटकून गटारात पडणं, अशा तिला घाबरवून टाकणाऱ्या घटना घडतात त्या वेगळ्याच!

हे सगळं चाललं असताना अलीच्या शाळेत धावण्याच्या आंतरशालेय स्पर्धेची एक नोटीस लागते. सुरुवातीला

अलीचं त्या सूचनाफलकाकडे लक्षच जात नाही. जहिराचे बूट हरवल्यापासून ज्या अडचणींना अलीला तोंड द्यावं लागतंय, त्यानं त्याची व्यग्रता इतकी वाढलीय, की धावण्याची स्पर्धा तर सोडाच त्याचं अभ्यासातही लक्ष नसतं. अचानक स्पर्धेतील तिसऱ्या नंबराच्या विजेत्याला बुटांची जोडी बक्षीस म्हणून मिळणार असल्याचं अली वाचतो आणि अक्षरश: अंतर्बाह्य थरारून जातो. कसंही करून शर्यतीत भाग घेऊन तिसरा नंबर मिळवायचा व जहिराला बुटांची जोडी मिळवून द्यायची असा तो निश्चय करतो. बुटांची जोडी बक्षीस म्हणून मिळणार हे वाचल्यावर अलीच्या मनात विचार येतो तो जहिराचा. स्वत:चा विचार एक क्षणही त्याच्या मनात येत नाही.

शर्यतीचा दिवस उजाडतो. शाळाशाळांतून मैदानावर धावण्याच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी येणाऱ्या मुलांची झुंबड उडते. कितीतरी मुलं श्रीमंत घरातली असतात. त्यांच्या पालकांनी मुलांसाठी नवीन बूट, शर्ट, ग्लुकोजची पावडर अशा गोष्टी आणलेल्या असतात. मुख्य म्हणजे मुलांना प्रोत्साहन द्यायला ते स्वत:च आलेले असतात. अलीपाशी मात्र यांतलं काहीच नसतं. त्याचे आईवडील शर्यत पाहायला येऊ शकलेले नसतात. खरं तर अलीनं शर्यतीत भाग घेतलाय हे सुद्‌धा त्यांना माहीत नसतं.

शर्यत सुरू होते. मैदानावर मुलं धावायला लागतात. प्रचंड कोलाहल सुरू होतो. हळूहळू शर्यतीचा जोर सर्वांच्या अंगात भिनायला लागतो. पाच-सात मुलं शर्यतीत अग्रेसर राहतात. त्यात एक नंबर अलीचा असतो. सुरुवातीपासून अलीनं शर्यतीतलं आपलं स्थान टिकवून ठेवलं आहे. गेल्या महिन्याभरातील सतत शाळेत धावत येण्याची सवय अलीला यावेळी खूप उपयोगी पडते आहे; पण अली सारखा पहिला येतोय. आपलं तीन नंबरचं स्थान टिकवून धरण्यासाठी त्याला धडपडावं लागतंय, म्हणजे पहिला, दुसरा नंबर येण्याइतकं पुढे जायचं नाही आणि पाचवा, सहावा येण्याइतकं पाठी राहायचं नाही अशी दुहेरी कसरत करत अली धावतोय. शेवटी एकदाची शर्यत संपते. एकच जल्लोष होतो. अली तर इतका दमतो, की त्याला जवळपास भोवळच येते.

थोडासा भानावर आल्यावर सगळ्यांत आधी अली मोठ्या आशेनं शिक्षकांना विचारतो, ''सर, मी तिसरा आलो ना?'' शिक्षकांना त्याच्या या प्रश्नाचा अर्थच कळत नाही. ते उलट मोठ्या कौतुकानं अलीला तो तिसरा नसून पहिला आल्याचं सांगतात.

शिक्षकांचे ते शब्द अलीच्या कानांवर पडतात. तो कमालीचा निराश होतो. त्याच्या हृदयात आकांत माजतो. आपण तिसरे आलो नाही याचा अर्थ आपल्याला बुटांची जोडी बक्षीस म्हणून मिळणार नाही, हे त्याच्या लक्षात येतं. जहिराला तर त्यानं बूट घेऊन येतोच असं जोरदार आश्वासन दिलेलं असतं. आपण कोणत्या तोंडानं बहिणीसमोर जावं हे कोडं अलीला उलगडत नाही. उरलेल्या समारंभात अलीच्या चेहऱ्यावर हास्याची किंचितशीही रेखा दिसत नाही.

शेवटी निरुपाय होऊन अलीला घरी जावंच लागतं. दारातून आत शिरताच समोरच त्याला जहिरा दिसते. उत्कंठेनं त्याची वाट बघणारी. रिकाम्या हातानं समोर उभ्या राहिलेल्या भावाला बघताच जहिरा काय समजायचं ते समजते.

खरं म्हणजे, हा चित्रपट इथंच संपतो किंवा संपायला हवा. मात्र त्यात मध्येच केवळ काही सेकंद टिकणारं एक दृश्य दाखवलं गेलंय. चित्रपटाच्या अगदी शेवटी अलीचे वडील सायकल हातात धरून घरी येताना दाखवले आहेत. त्यांच्या सायकलच्या मागच्या बाजूला, स्टँडला लावलेली बुटांची दोन खोकी प्रेक्षकांना दिसतात. किंचित उघड्या असलेल्या त्या खोक्यांतून डोकावणारे बूट, एक जोड अलीचा तर दुसरा जहिराचा आहे याची साक्ष पटवतात व प्रेक्षक सुटकेचा नि:श्वास टाकतात.

(गोष्टी जन्मांतरीच्या..)

**शब्दार्थ :**

**तुटपुंजा** – अल्प, कमी. **आघाडी सांभाळणे** – जबाबदारी सांभाळणे. **पथ्य** – नियम. **खोबण** – लाकडामधील खाच. **यक्षप्रश्न** – कठीण प्रश्न. **जीव तोडून पळणे** – सर्वशक्तीनिशी पळणे. **झुंबड उडणे** – गर्दी होणे. **कोलाहल** – मोठा आवाज, गडबड, गोंधळ. **अग्रेसर** – सर्वांत पुढे. **आकांत माजणे** – खूप दु:ख होणे.

## कृती

**(१) खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) अली व जहिरा यांचे आयुष्य बदलून टाकणारी घटना → [ ]

(आ) अलीचे गुणविशेष

**(२) तुलना करा.**

| स्पर्धक अली | इतर स्पर्धक मुले |
|---|---|
| (१) .................... | (१) .................... |
| (२) .................... | (२) .................... |

**(३) अलीच्या बाबतीत प्रस्तुत घटना केव्हा घडल्या, ते लिहा.**

(अ) अली अक्षरश: थरारला.

(आ) अली कमालीचा निराश झाला.

**(४) कारणे लिहा.**

(अ) दोन्ही मुलांना घराच्या बाहेरच्या कामाची आघाडी सांभाळावी लागायची, कारण.....

(आ) अलीला दुकानदाराची बोलणी खावी लागली, कारण.....

(इ) हेडमास्तरांनी अलीला शाळेत येण्यास बंदी घातली, कारण.....

**(५) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

(१) अनुकूलता × ................ (३) शेवट × ................

(२) द्रुतगती × ................ (४) आनंदी × ................

**(६) खालील शब्दांचे पहिले अक्षर बदलून दुसरा अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

उदा., कडक-तडक

(अ) कांदा- (आ) सुजाण- (इ) स्वाभिमान-

**(७) स्वमत.**

(१) स्पर्धेत पहिला नंबर पटकावला तरीही अली नाराज झाला, त्याची कारणे तुमच्या शब्दांत सांगा.

(२) तुम्ही आणि तुमच्या भावंडांमधील प्रेम दर्शवणारा एखादा प्रसंग लिहा.

(३) धावण्याच्या स्पर्धेत तुम्हांला प्रथम क्रमांक मिळाला आहे, अशी कल्पना करून तुमच्या भावना स्पष्ट करा.

**उपक्रम :**

आंतरजालाच्या साहाय्याने 'चिल्ड्रन ऑफ हेवन' हा चित्रपट मिळवा, पाहा व त्याचा आनंद घ्या.

***

ADHBLQ

# ५. खोप्यामधी खोपा

**बहिणाबाई चौधरी** (१८८० ते १९५१) :

शेतकऱ्याच्या कुटुंबातील संसारी स्त्रीची सुखदु:खे अनुभवताना अंत:स्फूर्तीने बहिणाबाईंनी काव्यनिर्मिती केली. माणुसकी, निसर्गाशी समरसता, डोळस श्रद्धा आणि खेड्यातल्या समूहजीवनाची जाणीव त्यांच्या कवितेतून दिसून येते. मनातला जातिवंत जिव्हाळा प्रकट करणारी अल्पाक्षरी शैली, भोवतालच्या निसर्गाचा, मानवी जगण्याचा खानदेशी बोलीतील सहजस्फूर्त आविष्कार ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र कविवर्य सोपानदेव यांनी आचार्य अत्रे यांच्या प्रोत्साहनामुळे 'बहिणाईची गाणी' (१९५२) हा कवितासंग्रह प्रकाशित केला.

प्रस्तुत कवितेत कवयित्रीने सुगरण पक्षी व माणूस यांची तुलना करून सुगरण पक्ष्यामध्ये असणाऱ्या सृजनशीलतेचे वर्णन केले आहे. सुगरण पक्ष्याप्रमाणे माणसाने आपल्या निसर्गदत्त देणगीचा उपयोग करून, सौंदर्यदृष्टीने नवनिर्मिती करावी असा संदेश दिला आहे.



**अरे खोप्यामधी खोपा**  
**सुगरणीचा चांगला**  
**देखा पिलासाठी तिनं**  
**झोका झाडाले टांगला ।**

**पिलं निजले खोप्यात**  
**जसा झुलता बंगला**  
**तिचा पिलामधी जीव**  
**जीव झाडाले टांगला ।**

**खोपा इनला इनला**  
**जसा गिलक्याचा कोसा**  
**पाखराची कारागिरी**  
**जरा देख रे मानसा ।**

**तिची उलूशीच चोच**  
**तेच दात, तेच ओठ**  
**तुले देले रे देवानं**  
**दोन हात दहा बोटं ।**

(बहिणाईची गाणी)

**शब्दार्थ :**

**खोपा** – सुगरण पक्ष्याचे घरटे. **इनला** – विणला. **कोसा** – दोडका, घोसाळे इत्यादी वेलींवरच्या भाज्यांची फळं बियांसाठी टांगून ठेवली जातात. सुकल्यानंतर वरचे टरफल गळून पडते. टरफलाच्या आतील तंतूंचा सांगाडा तसाच राहतो त्याला 'कोसा' म्हणतात. तो सुगरणीच्या खोप्यासारखा दिसतो.

## कृती

**(१) फरक स्पष्ट करा.**

| सुगरण | माणूस |
|---|---|
| | |
| | |
| | |

**(२) खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ)

**सुगरणीच्या खोप्याला कवयित्रीने दिलेल्या उपमा.**

(आ)

**सुगरणीकडून माणसाने घ्यायचे गुण.**

**(३) 'पिलं' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**(४) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(अ) चांगला–

(आ) कोसा–

**(५) स्वमत.**

(१) सुगरणीला तिच्या बाळाची काळजी असते, हे कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.

(२) सुगरणीला तिच्या पिलांची काळजी वाटते तशी तुमच्या आईलाही तुमची काळजी वाटते, हे सोदाहरण स्पष्ट करा.

(३) 'तुले देले रे देवानं, दोन हात दहा बोटं ।' ही ओळ काय सुचवते ते तुमच्या शब्दांत सांगा.

**उपक्रम :**

तुम्हांला आवडणाऱ्या पक्ष्यांची माहिती वर्तमानपत्रे, अवांतर पुस्तके व आंतरजाल यांच्या साहाय्याने मिळवा व त्याचा संग्रह करा.

ADH7ND

***

## ६. मकबरा–माझ्या मनातला!

**डॉ. यू. म. पठाण** (१९३०) :

सुप्रसिद्ध साहित्यिक, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक, व्यासंगी वक्ते. पुणे येथे १९९० साली भरलेल्या त्रेसष्टाव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. 'भाऊसाहेबांची बखर', 'मराठवाड्यातील लोककथा', 'नवरस नारायणकृत शल्यपर्व', 'गोपाळदासकृत शुकदेव चरित्र', 'महानुभाव साहित्य संशोधन : खंड १' इत्यादी संशोधनपर संपादित ग्रंथ; 'संतसाहित्यचिंतन', 'शोधणी', 'अजून आठवतं' इत्यादी लेखसंग्रह अशी विपुल साहित्यनिर्मिती त्यांनी केली आहे. मराठवाड्यात विखुरलेल्या शिलालेखांचा, ताम्रपटांचा शोध हे त्यांचे महत्त्वाचे संशोधन कार्य आहे.

प्रस्तुत पाठात बीबी का मकबरा आणि लेखक यांच्यातील जिवाभावाच्या मैत्रीचे वर्णन केले आहे. तसेच मकबऱ्याचे विलोभनीय वर्णन करताना आपल्या सुखदु:खांच्या क्षणांचा साक्षीदार मकबरा आहे, याचेही लेखकाने वर्णन केले आहे.



पंचवीस–तीस वर्षं झाली, तरी बीबीच्या मकबऱ्याला माझा नि मला मकबऱ्याचा कधी कंटाळा आला नाही. खरं तर आम्ही रोज एकमेकांना पाहतो. मकबरा माझ्याकडे नि मी मकबऱ्याकडे. जिवाभावाचे दोन स्नेही जसे रोज एकमेकांना भेटतात, तसे आम्ही रोज भेटतो. माझी नि त्याची ही मैत्री फक्त त्याला नि मलाच ठाऊक आहे, कारण त्याला भेटल्याशिवाय मला करमत नाही नि मला भेटल्याशिवाय त्याला करमत नाही.

माझी विद्यापीठाला जायची वाटच मुळी मकबऱ्यावरून गेली आहे. वर्षातून फार मोठे चार–दोन पाऊस आले, की मकई गेटवरून पाण्याचे लोंढेच्या लोंढे खालच्या प्रवाहातून वाहताना, फेसाळताना दिसू लागतात. मकई गेटच्या पुलाजवळचे कठडे मुला–माणसांनी फुलून जातात. त्या वेळी मात्र मकबऱ्यावरून विद्यापीठाकडे जायची वाट चिखलाळते. तिथल्या अरुंद पुलावरून पाणी वाहू लागतं, मग स्कूटर नेणंच अशक्य होतं. अशा दिवशी मात्र मकई गेटवरून, मकबऱ्याची नजर चुकवून, मी जयसिंगपुऱ्यावरून विद्यापीठाच्या भव्य 'अजिंठा आर्च'कडे वळतो; पण तिच्यातून प्रवेशतानाही मन काहीसं कावरंबावरं होतं. थोडंसं अपराध्यासारखं वाटायला लागतं. वाटतं, मकबरा आज आपली वाट पाहत असेल. काल दिवसभर काय काय घडलं, ते सांगायला उत्सुक असेल. दिवसभरात जगातल्या कोणकोणत्या देशांतले प्रवासी आले हे सांगायला तो उत्सुक असेल. आपण काल काय काय केलं, ते ऐकायला त्याचे मिनार आसुसलेले असतील. त्याची बारादरी माझ्यासाठी साद घालत असेल. त्याचा तेजस्वी घुमट आपल्या नितळाईचे नेत्र करून माझी वाट पाहत असेल. आज मी का आलो नाही, या विचारानं त्याचं मनही गलबलून गेलं असेल.

अशा वेळी मी विद्यापीठ गेटमधून गेलो, तरी माझं मन मात्र उदासवाणं होत असतं. खरं तर गेटमधून उंचावरून समोरचे डोंगर किती छान दिसतात! श्रावणातील हिरव्या लवीनं ते मोठे गोजिरवाणे वाटतात. क्षणात पडणाऱ्या पावसाच्या सरीनं ते न्हाऊन निघतात, त्यांची कांती तेजोमय झालेली असते. क्षणात पडणाऱ्या कोवळ्या उन्हानं ते तुकतुकीत दिसायला लागतात. त्यांच्यातून ओसंडणारे झरे मी प्रत्येक वर्षी माझ्या मनाच्या कोशात खोल खोल दडवून ठेवतो. या झऱ्यांचे तुषार माझ्या मनाला नेहमीच खुलवत–फुलवत असतात. दुरूनच निपटनिरंजनांची समाधी त्या आसमंताला शुचितेची, पावित्र्याची जणू सादच देत असते. विद्यापीठ गेटमधून वाटचाल सुरू झाली, की डामरी रस्त्याची नागीण कधी सरळ तर कधी नागमोडी वळणं घेत, अतिथिगृहावरून नि मुलांच्या वसतिगृहांवरून सावकाश सरपटत जात असते. विज्ञान विभागांना एका अंगाला टाकून जेव्हा ती कला–विद्याशाखेच्या इमारतीकडे वळू लागते, त्याच वेळी मी शेडमध्ये स्कूटर ठेवून माझ्या अभ्यासिकेकडे येत असतो. खरं तर शेडमध्ये स्कूटर ठेवत असताना, मकबरा माझ्या पापणीच्या कडेत मला दिसत असतो. त्याच्याकडे पाहण्याचं साहस मला होत नाही. खालच्या मानेनं मी ब्रीफकेस हेलकावत माझ्या अभ्यासिकेत प्रवेश करतो.

वाटेत भेटणाऱ्या माझ्या विद्यार्थ्यांची सस्मित भेट घेत घेत; पण अभ्यासिकेत येताच समोरच्या खिडक्यांच्या कानात दत्त म्हणून उभा असतो मकबरा!

''चकवलंस ना आज मला?''– तो.

''हूं.'' – मी.

''थोडा वेळ थांबला असतास, तर पुलावरचं पाणी कमी झालं नसतं का? मग माझ्या वाटेनं विद्यापीठाला नसतं का जाता आलं?''

''हो...पण...''

''पण नाही नि बिण नाही. तुला आज मला चुकवायचं होतं. भेटायचंच नव्हतं..''

''नाही रे, तसं नाही, पण...''

मी गयावया करत म्हणतो, नि तो पुन्हा दरडावून म्हणतो, ''पण नाही नि बिण नाही. तुला चुकवायचंच होतं. नक्कीच चुकवायचं होतं. आताशा तुला कंटाळा येतोय ना माझा? मला कालचं सारं सारं सांगायचं होतं नि तू मात्र सरळ 'आगऱ्याहून सुटका' करून घेतलीस जयसिंगपुऱ्याच्या वाटेनं?..''

अन् मग मकबरा खो-खो करून हसू लागतो. मीही त्याच्याबरोबर मनसोक्त हसतो. खूप खूप हसून झाल्यावर तो मला म्हणतो, ''असं नाही हं करायचं पुन्हा.'' अन् मीही त्याला म्हणतो, ''असं नाही हं करायचं पुन्हा!''

माझ्या अभ्यासिकेच्या काचेच्या विस्तीर्ण खिडकीतून मी मकबऱ्याची कितीतरी रूपं पाहिली आहेत. सकाळची, दुपारची, संध्याकाळची नि रात्रीची. माझ्या जीवनातले उन्हाळे, पावसाळे नि हिवाळेही मकबऱ्यानं पाहिले आहेत.

तासन्तास मी महानुभाव पोथ्यांच्या सांकेतिक लिप्यांत डोकं खुपसून बसे, तेव्हा मकबऱ्यानंच माझ्या नेत्रांवर, शीतलतेचा शिडकावा केला आहे. तेराव्या शतकाच्या चोंभा कवीच्या 'उखाहरणा'सारख्या अपूर्व काव्याच्या संपादनाचा आस्वाद मी ज्या ज्या क्षणी घेत असे, त्या एकांताच्या क्षणांत फक्त मकबराच माझ्या त्या मनसोक्त आनंदाला प्रतिसाद देत असे. मराठवाड्यातल्या मराठी शिलालेखांच्या कोरीव अक्षरांच्या खोबणीत जेव्हा माझे डोळे तासन्तास धसत, थकून रुतून जात, तेव्हा मकबऱ्याच्या मिनारांनीच माझ्या पाठीवर मायेचा हात फिरवला आहे. माझ्या अभ्यासिकेच्या काचेच्या खिडकीतून हात लांब करत आपल्या नाजूक बोटांनी त्यानेच मला सावरलं आहे.

माझ्या ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाला, माझ्या व्याख्यानमाला गाजल्या, आदर्श प्राध्यापक म्हणून माझा गौरव झाला, मला डी. लिट. मिळाली, राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून माझा सन्मान झाला, 'संतसाहित्यचिंतना'सारख्या माझ्या पुस्तकाला श्रेष्ठ संतसाहित्यविषयक ग्रंथाचा पुरस्कार मिळाला, मला परदेशाची निमंत्रणं आली, की त्या बातम्या सांगणारी जी पत्रं नि तारा माझ्या टेबलावर येऊन पडत, ती पाकिटं फोडून या बातम्या मी प्रथम कुणाला सांगत असे? काचेच्या खिडकीतून माझ्याकडे टक लावून पाहणाऱ्या मकबऱ्याला! मग मकबऱ्याचे मिनार मिस्कीलपणे हसत-डोलत. त्याचा घुमट तरारून येई. माझ्या यशानं त्यालाही तेज चढे. त्याच्या स्नेहशील दृष्टीच्या वर्षावात मी अखंड न्हाऊन निघत असे. माझ्या आयुष्यात या स्नेहाळ क्षणांना फार फार मोलाचं स्थान आहे. हे सारे क्षण मी माझ्या हृदयात खोल खोल जपून ठेवले आहेत, दडवून ठेवले आहेत. मकबऱ्यानं जसं माझं सुख पाहिलं आहे, तसंच दुःखही अनुभवलं आहे.

गेली पंचवीस-तीस वर्ष हा हसू-आसूंचा खेळ अविरत चालला आहे. यापुढंही चालणार आहे. माझ्या मनातला मकबरा माझ्याबरोबर युगानुयुगं अशीच वाटचाल करणार आहे. हिवाळ्यात, पावसाळ्यात नि उन्हाळ्यातदेखील...

(पाऊलखुणा)

**शब्दार्थ :**

**चिखलाळणे** – चिखलाने माखणे. **नितळाई** – नितळपणा. **लव** – कोवळं गवत. **तेजोमय** – तेजस्वी. **शुचिता** – पावित्र्य. **दत्त म्हणून उभे असणे** – अचानकपणे समोर उभे येऊन राहणे. **शिडकावा** – शिंपण. **स्नेहाळ** – प्रेमळ.

## कृती

**(१) खालील आकृत्या पूर्ण करा.**

(१) लेखकाला मिळालेले पुरस्कार, सन्मान

(२) लेखकाच्या मनात आलेले विचार

मकबरा लेखकाची वाट बघत असताना

लेखक मकबऱ्याला टाळून गेल्यानंतर

**(२) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) मिनार | (१) वाट पाहतो. |
| (आ) घुमट | (२) साद घालत असते. |
| (इ) बारादरी | (३) आसुसलेले असतात. |

**(३) एका शब्दात उत्तर लिहा.**

(अ) चोंभा कवीचा काव्यसंग्रह –

(आ) लेखकाचा संतसाहित्यावरील ग्रंथ –

(इ) लेखकाला मिळालेली पदवी –

(ई) मकबऱ्याचे नाव –

**(४) योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

(चेहरा, मन, गवत, झरे, पाणी, डोळे)

(१) कावरंबावरं ....................

(२) तुकतुकीत ....................

(३) आसुसलेले ....................

(४) ओसंडणारे ....................

(५) गोजिरवाणे ....................

(६) खळखळणारे ....................

**(५) खालील परिच्छेद वाचा. त्यातील नामे, सर्वनामे, विशेषणे व क्रियापदे ओळखा.**

खूप दिवसांनी अन्वर आज बागेत खेळायला गेला होता. त्याला त्याचा जिवाभावाचा मित्र इरफान दिसला. त्या दोघांना एकमेकांना पाहून खूप आनंद झाला. त्यांनी एकमेकांबरोबर मनमुराद गप्पा मारल्या. त्यानंतर त्या दोघांनी बॅडमिंटनही खेळले.

घरी जाताना अन्वर इरफानला म्हणाला, ''मित्रा, आज आपण खूप दिवसांनी भेटलो. मला खूप आनंद झाला आहे. तू नव्हतास तर मला अजिबात करमत नव्हतं.'' त्यावर इरफानने त्याचा हात हातात घेतला आणि म्हणाला, ''मित्रा, उद्यापासून आपण दररोज बागेत भेटायचं आणि भरपूर खेळायचं.''

**(६) स्वमत.**

(१) 'मकबरा आणि लेखक' यांच्यातील मैत्रीचे नाते तुमच्या शब्दांत लिहा.

(२) मकबरा लेखकाच्या सुखदु:खांच्या क्षणांचा साक्षीदार आहे, हे विधान पाठाच्या आधारे पटवून द्या.

**उपक्रम :**

(१) तुम्ही पाहिलेल्या एखाद्या ऐतिहासिक स्थळाची माहिती मिळवा.

(२) 'बीबी का मकबरा' या ऐतिहासिक स्थळाची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा.

(३) 'मकबरा आणि लेखक' यांच्यातील संभाषणाचे संवादलेखन करून सादरीकरण करा.

## भाषा सौंदर्य

- **खालील शब्दकोड्यात काही शब्दसमूह लपलेले आहेत ते शोधा व त्यांची यादी तयार करा.**

उदा., धुडकावून लावणे.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पो | व | का | व | रा | बा | व | रा | हो | णे | सा |
| टा | र | का | न | गो | ष्टी | क | र | णे | आ | रा |
| त | म | क | वा | ट | ला | व | णे | पा | सु | ब |
| का | णे | ट | का | वा | व | ज | न | अ | स | णे |
| व | धु | म | प | ळ | णे | का | का | व | णे | म |
| ळे | ड | झ | रे | की | अ | स | र | हो | णे | र |
| ओ | का | डो | भ | क | व | र | दे | णे | क्ष | ग |
| र | वू | ळ्या | र | र | न | म | णे | म | आ | ळ |
| ड | न | त | णे | णे | वा | णे | का | न | क | ये |
| णे | ला | स | मा | न | सी | व | ळ | व | ळ | णे |
| स | व | ल | त | घे | हो | सं | ता | प | णे | मा |
| ध | णे | णे | क | र | णे | त | फु | ल | णे | ज |

***

AE63Q1

## ७. बदलणं म्हणजे...

**मल्हार अरणकल्ले** (१९५२) :

प्रसिद्ध लेखक. सकाळ वृत्तपत्राचे संपादक. सुमारे ३५ वर्षे पत्रकारितेत कार्यरत आहेत. साध्या, सोप्या व प्रवाही भाषेत लेखन आणि ललितलेखनातील विविध प्रयोग ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. 'पहाटवारा', 'दैनंदिनी', 'मोगरा फुलला', 'काही असं-काही तसं', 'परिमळ', 'पहाटपावलं' इत्यादी वाचकप्रिय सदरांचे लेखन त्यांनी केले आहे. यांतील काही सदरांची पुस्तकेही प्रसिद्ध आहेत. पत्रकारितेतील आचार्य अत्रे पुरस्कार, नरूभाऊ लिमये पुरस्कार या पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. विविध दिवाळी अंकांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे.

ऋतुमानाप्रमाणे होणारे बदल निसर्ग जसा सहज स्वीकारतो, त्याप्रमाणे माणसाने आपल्या आयुष्यातील बदल आनंदाने स्वीकारावेत, असे प्रस्तुत पाठात लेखकाने सुचवले आहे.

नेहमीच्या वापरातलं फाऊंटन पेन कुठं तरी गायब झालं होतं. बराच शोध घेऊनही काही केल्या ते सापडत नव्हतं. त्याखेरीजची वापरातील इतर पेनं घेऊन काम चालण्यासारखं होतं हे खरं; पण तरीही सारखं वाटतच होतं, की ते नेहमीचंच पेन मिळायला हवं. असं काय वेगळं होतं बरं त्यात? खरं म्हणाल तर ते कुठल्याही पेनासारखंच पेन होतं; पण तरीही वापराच्या नित्य परिचयानं तेच काहीसं वेगळं वाटू लागलं होतं. जिथं जिथं पेन लपून बसलं असावं असं वाटत होतं, तिथं तिथं पुन:पुन्हा पाहिलं. पेन काही मिळालं नाही. अखेर दुसरं पेन घेऊन काम सुरू केलं.

हे पेन काहीसं वजनदार आहे, त्याचं वळण काही पहिल्या पेनासारखं नाही, रंगही तेवढा शोभेसा नाही, शाई थोडी फिकटच वाटते, अक्षरही किरटं येत आहे अशी काही वैगुण्ये त्यात दिसू लागली. त्याच त्या विचारांनी, ते पेन वापरू नये असं एकसारखं वाटू लागलं. एखादी दाट परिचयाची, खास स्नेहातली व्यक्ती दिवसभर भेटली नाही, तिच्याशी संवाद करता आला नाही की आपण अस्वस्थ होतो, तसंच काहीसं झालं. पुन्हा एकदा ठरवलं, की ते काही नाही पूर्वीचं फाऊंटन पेन शोधून काढायचंच. असेल कुठं तरी कप्प्यात एखाद्या पुस्तकात; पण ते शोधायचंच. आश्चर्य नव्हे खरोखरच, दुसरं पेन हातात घेऊन पहिल्यासारखं लेखन करताच येईना. मनालाही मरगळ वाटू लागली. बेचैनी वाढली. कार्यालयातून घरी परतल्यावर थोड्या वेळानं पुन्हा बाहेर पडलो. ताज्या, शुद्ध हवेत फिरून यावं, म्हणजे जरा बरं वाटेल असं वाटलं.

थंडी दूर पळाली होती आणि उष्मा वाढू लागला होता. दिवसही मोठा झाला होता. सायंकाळ झाली, तरी सगळीकडे लख्ख उजेड होता. हिवाळ्यात आक्रसलेली झाडे, वेली उन्हाच्या कडकपणामुळे तापू लागल्या होत्या. काही झाडांची पानगळ सुरू झाली होती. झाडांचे खराटे दिसू लागले होते. त्यांच्या वेड्यावाकड्या फांद्यांची नक्षी वेगवेगळे आकार घेऊन फिरत होती. वाऱ्याच्या फेऱ्याबरोबर धूळ, पाचोळा भिरभिरत होता. दुपारचा उकाडा कमी झाला होता. सुखद वारं फिरू लागलं होतं. काही दिवसांपूर्वीच हिवाळा कुठल्याकुठं गायब झाला होता.

केवढा मोठा बदल; पण सारं कसं आगगाडीनं रूळ बदलावा, तसं सहजपणानं घडून आलेलं, निसर्गत: झालेलं. निसर्ग कसा बदलतो? नवनवे बदल कसे स्वीकारतो? हिवाळा संपला, की तो उन्हाळा सामावून घेतो आणि उन्हाळा गेला की तो पावसाळ्यात रंगून जातो. निसर्ग केवळ हे एवढेच बदल स्वीकारतो असं नव्हे, तर त्याच्याबरोबर कितीतरी गोष्टी बदलतात. पावसाळ्यात धरणीतून कोवळे अंकुर डोलू लागतात, झाडांवर फुलं हसू लागतात, आकाशातून रेशीमधारा बरसू लागतात, विजांचा कडकडाट होतो आणि ढगांचे गडगडाटी नगारे घुमू लागतात. नदी, नाले तुडुंबतात आणि डोंगरमाथ्यांवरून फेनिल धबधबे उड्या घेऊ लागतात. सृष्टी मखमली हरितवसन लेऊन खुलून जाते. उन्हाळा हे सारं पिऊन टाकतो आणि यापेक्षा वेगळाच बदल पृथ्वीतलावर घडून येतो. पावसाळ्यात अतिवृष्टीनं कुठं पुराचं थैमान होतं, तसं उन्हाळ्यातली शिरशिरीही वेगळा अनुभव देते. एक झालं, की दुसरं मग तिसरं, नंतर आणखी पुढचं...सतत नवेनवे बदल. नवं वातावरण. सारं सहजपणानं घडत राहणारं.

हे सारं वादळ मनात फेर घालत होतं. निसर्ग हे बदल कसे काय स्वीकारतो? तो कुठं अस्वस्थ होतो? तो हे बदल सामावून घ्यायला कुठं विरोध करतो? आलेला बदल स्वीकारला, असं तर निसर्गात सतत होत असतं. नेहमीच्या

वापरातल्या फाऊंटन पेनाऐवजी दुसरं पेन स्वीकारायला माझं मन मात्र कुरकुरत होतं. एक अगदी साधा, किरकोळ बदल; पण त्यानं आलेली अस्वस्थता केवढी! सारा मनाचा खेळ. वास्तविक, एवढा साधा बदल सहजगत्या पचवायला हवा; पण तेही जमत नव्हतं.

आपण बदल स्वीकारताना कुरकुर करतो. बदलांवर टीका करतो. 'नकोच' अशी आग्रही भूमिका घेतो. बदलात काही स्वागतार्ह आहे की नाही तेही तपासून पाहत नाही. बदल म्हटला, की विरोध असं आपलं वर्तन असतं. एखादी सुधारणा होणार असली तरी आपण विरोधात उभे ठाकतो. सुधारणा हा वरवरचा मुलामा आहे, तो दिखाऊ आहे, त्यामागे दडलेले वास्तव वाईट आहे अशी भूमिका हिरिरीनं मांडतो, विजय साजरा करतो. अशामुळे बदल दूर जातो.

इतके उन्हाळे, पावसाळे अनुभवत आपण वाढत राहतो, नवनवे अनुभव पचवत जीवनक्रम करत राहतो; पण आजूबाजूच्या निसर्गापासून एवढंही शिकू शकत नाही? नाही, आपण बदल सहजासहजी स्वीकारतच नाही. सक्ती केली, तरच आपण बदलांना मान्यता देतो. आपण बदलत नाही, म्हणून आक्रसलेले, दुर्मुखलेले राहतो. बदलणं हा निसर्गाचा स्थायीभाव आहे. तो त्याचा स्वभाव आहे. आपण वर्तनातला बदल खपवून घेऊ शकत नाही, तिथं स्वभाव बदलण्याची गोष्ट दूरच ठेवली पाहिजे. 'मी असा आहे', असं सांगण्यातच आपल्याला धन्यता वाटते. आपण त्याचाच अभिमान बाळगतो.

बदलणं म्हणजे फुलणं, बहरणं, कात टाकणं. जुनं सोडून नवं होणं. झाडावर कोवळी पालवी येते. पानं वाढू लागतात. पानांआड कळ्या हसू लागतात. त्यांची फुलं होतात. झाडावर सुगंधाचा, सौंदर्याचा उत्सव बहरतो. फुलांतून फळं, फळं-फुलं गळून जाणं...पुन्हा पालवी, कळ्या, फुलं आणि फळं...बदल, एकसारखा बदल.

बदलणं म्हणजे दुसऱ्याच्या भावनांशी समरस होणं, दुसऱ्याला समजून घेणं. आपण बदलायला हट्टानं नकार देतो आणि आयुष्यात विसंवाद ओढवून घेतो. बदललो नाही, तर दुसऱ्या कोणाशी सूर जुळणारच नाहीत. सप्तरंग म्हणजे काय आहे? एकातून दुसरा बदल आणि त्यातून विकसित झालेलं रंगांचं अनुपम सौंदर्य. सप्तसूर म्हणजे तरी काय आहे? एकापेक्षा वेगळा सूर, त्या सुरावटींच्या सरमिसळीतून उमललेलं संगीत. ही सुरावट बदलली नाही, एका सुरानं दुसरा सूर स्वत:शी जुळवून घेतला नाही, तर सुरावट जमणार कशी? बदल आहे म्हणून तर एकमेकांचं महत्त्व आहे. काळ्या रंगामुळं पांढऱ्याला महत्त्व आहे, हिरव्या रंगाची खुलावट लाल रंगामुळे उजवी दिसते. ताण हलका होतो, तो हास्यामुळं आणि दु:ख विसरतं, ते आनंदाच्या शिडकाव्यामुळं!

लहान मूल एका खेळण्यात फार काळ रमत नाही. त्याला नावीन्याची ओढ असते. त्याच्या दृष्टीतच नवेपणाला सामोरं जाण्याचं तेज असतं. आपण वाढत्या वयाबरोबर हा तजेला हरवून बसतो आणि एकेका गोष्टीशी जखडून पडतो. नोकरीतली बदलीही आपण टाळतो. बदलीच्या गावाला जाणं, तिथला निसर्ग, माणसं न्याहाळणं, त्या प्रदेशाशी एकरूप होण्यातला आनंद घेणं, त्याला आपल्या लेखी काही महत्त्व नसतं. आपल्याला बदलायचं नसतं, म्हणूनच आपण बदली टाळतो. 'बदला'कडं पाहण्याची दृष्टी बदलण्यापासूनच आपण बदलांना स्वीकारण्याचा अभ्यास सुरू करू. डावं-उजवं जरूर तपासा; पण बदलणारच नाही, अशी एकांगी भूमिका घेऊ नका. नव्याचं स्वागत करायचा संदेश वसंतागमनाबरोबर आपण स्वीकारणार का?

(अलगुज)

**शब्दार्थ :**

**किरटं** - वाचता न येण्यासारखे बारीक (अक्षर). **वैगुण्य** - दोष. **मरगळ** - निरुत्साह. **फेनिल** - फेसाळणारा. **हरितवसन** - हिरवे वस्त्र. **शिरशिरी येणे** - अंगावर बारीक काटा येणे. **स्थायिभाव** - मूळ स्वभाव. **सुरावट** - स्वरांची बांधणी, चाल. **खुलावट** - सजावट, शोभा.

## कृती

**(१) खालील आकृती पूर्ण करा.**

(१) बदललेल्या पेनमध्ये आढळलेली वैगुण्ये

(२) लेखकाच्या मते बदलणं म्हणजे

**(२) बदल स्वीकारण्याच्या बाबतीत लेखक व निसर्ग यांची तुलना करा.**

| लेखक | निसर्ग |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |

**(३) पाठाच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| पावसाळा सुरू झाल्यानंतर निसर्गात झालेले बदल | उन्हाळा सुरू झाल्यानंतर निसर्गात झालेले बदल |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |

**(४) लेखकाच्या मते सप्तरंग म्हणजे काय, ते स्पष्ट करा.**

**(५) सरळरूप (मूळ शब्द) लिहा.**

| शब्द | सरळरूप |
|---|---|
| (१) पावसाळ्यात | |
| (२) आकाशातून | |
| (३) पक्ष्यांची | |
| (४) झाडाने | |

**(६) खालील तक्त्यात मुलांना आवडणाऱ्या काही गोष्टींची नावे दिली आहेत. त्या गोष्टींविषयी विशेष माहिती देण्यासाठी तुम्ही कोणकोणते शब्द वापराल, याची मित्रांबरोबर चर्चा करा व तक्ता पूर्ण करा.**

| मुलांची नावे | आवडणारी गोष्ट/पदार्थ | विशेष माहिती सांगणारे शब्द |
|---|---|---|
| रमेश | आंबा | गोड, पिवळाधम्मक, रसरशीत.... |
| अनय | चंद्र | |
| उदय | इंद्रधनुष्य | |
| जोसेफ | पाऊस | |
| हमीद | गुलाब | |

**(७) खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.**

(अ) ज्याला लिहिता-वाचता येत नाही असा-

(आ) कशाचीही इच्छा न बाळगणारा-

(इ) मोजकेच बोलणारा-

(ई) दुसऱ्यावर उपकार करणारा-

**(८) स्वमत.**

(अ) 'बदलणं म्हणजे दुसऱ्याच्या भावनांशी समरस होणं', या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.


(आ) 'माणूस बदल स्वीकारण्यास तयार नसतो', हे विधान आपल्या अनुभवाच्या आधारे पटवून द्या.

(इ) तुमची वर्गातील बसण्याची जागा बदलली तर- अशी कल्पना करून त्याबद्दल तुम्हांला काय वाटेल ते लिहा.

**उपक्रम :** तुमची आवडती वस्तू तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून तुमच्या दोघांतील संवादाचे लेखन करा.

**प्रकल्प :** ऋतुमानानुसार निसर्गातील घडणाऱ्या विविध बदलांचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी करा.

## वाचा



**आई :** तुषार, अरे तुषार आवर लवकर. आपल्याला किराणा सामान खरेदी करायला जायचं आहे. थोडे कपडेही खरेदी करायचे आहेत, चल आवर लवकर.

**तुषार :** आई, आज नको गं. मला खूपच कंटाळा आला आहे. आज मला सुट्‌टी आहे. खरेदीला गेलो, तर मला खेळायलाही मिळणार नाही.

**आई :** अरे, असं काय करतोस. आपण लवकर परत येऊ.

**वडील :** (तुषारच्या आईस) अगं, तुझा आणि तुषारचा वेळ खरेदीसाठी कशाला घालवतेस. आजकाल सर्व वस्तूंची खरेदी घरबसल्या करता येते. ऑनलाइन खरेदी कशी करायची ते मी तुला शिकवतो. यामुळे तुझा वेळ आणि श्रमही वाचतील. प्रयत्न करशील, तर तूही नक्कीच शिकशील.

**आई :** अहो, तुमचेही बरोबर आहे. घरबसल्या ऑनलाइन खरेदी केल्याने कितीतरी कामे सोपी होत आहेत. मला माझ्या कामाच्या पद्धतीत बदल केलाच पाहिजे. आजपासून मीही ऑनलाइन खरेदी करण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहे.

**वडील :** बरोबर आहे. काळानुरूप प्रत्येकानेच नवनवीन बदल स्वीकारले पाहिजेत.

***


AEEYRN

# ८. सायंकाळची शोभा

**भा. रा. तांबे** (१८७३ ते १९४१) :

प्रसिद्ध कवी, संस्कृत नाट्य वाङ्मयाचे अभ्यासक, इंग्रजी काव्याचा व्यासंग. युवराजांचे शिक्षक म्हणून नोकरी. दिवाण, पोलीस-सुपरिटेंडंट, सरकारी वकील, न्यायाधीश, शिक्षण खात्यात परीक्षा विभागाचे रजिस्ट्रार इत्यादी संस्थानी पदे भूषवली. १९३७ साली ग्वाल्हेरचे राजकवी म्हणून बहुमान. १९२६ मध्ये मध्य भारतीय कविसंमेलनाचे अध्यक्ष. त्यांची कलाविषयक निष्ठा विशुद्ध व आनंददायी असून, आत्मतृप्ती त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. 'राजकवी भास्कर रामचंद्र तांबे यांची समग्र कविता' हा संग्रह (संपादक : मा. त्रिं. पटवर्धन) प्रकाशित.

आकाशातील सूर्य मावळतीला जाताना पृथ्वीवर दिसणाऱ्या अप्रतिम सौंदर्याचे वर्णन कवीने सुबोध भाषेत केलेले आहे.



**पिवळे तांबुस ऊन कोवळे पसरे चौफेर**
**ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर.**

**झाडांनी किति मुकुट घातले डोकिस सोनेरी**
**कुरणावर शेतात पसरला गुलाल चौफेरी!**

**हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे**
**झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे!**

**सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे**
**रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे!**

**अशी अचल फुलपाखरे फुले साळिस जणु फुलती**
**साळीवर झोपली जणू का पाळण्यात झुलती.**

**झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरी उडती!**
**हिरे, माणके, पाचू, फुटुनी पंखचि गरगरती!**

**पहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा.**
**कुठे बुडाला पलीकडिल तो 'सोन्याचा गोळा?'**

(तांबे यांची समग्र कविता)

**शब्दार्थ :**
**चौफेर** – चारही बाजूंनी. **डोकिस** – डोक्यावर. **साळ** – भाताचे पीक. **अचल** – अस्थिर. **चरोनि** – चरून, खाऊन.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) कवीने वर्णन केलेली उन्हाची वैशिष्ट्ये

(आ) कवीने वर्णन केलेली फुलपाखरांच्या पंखांची वैशिष्ट्ये

**(२) 'इंद्रधनुष्य' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**(३) खालील संकल्पना आणि त्यांचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर | (१) कुरणावर, शेतात पसरलेला गुलाबी रंग म्हणजे जणू गुलाल! |
| (आ) कुरणावर शेतात पसरला गुलाल चौफेरी | (२) फुलपाखरांचे सुंदर विविधरंगी पंख म्हणजे जणू हिरे, पाचू, माणकं! |
| (इ) झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे! | (३) ओढ्यातील वाहते सोनेरी पाणी म्हणजे जणू सोने! |
| (ई) हिरे, माणके, पाचू, फुटुनी पंखचि गरगरती! | (४) साळीची शेते म्हणजे झोके घेणारे जणू हिरवे गालीचे! |

**(४) कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा व लिहा.**

**(५) कवितेच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) सोनेरी मुकुट घालणारी –

(आ) साळीवर झोपणारी –

(इ) सोन्याचा गोळा –

**(६) खालील परिच्छेद वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून परिच्छेद पुन्हा लिहा व वाचा.**

आवडले का तुला जेवण सागरला आई म्हणाली सागर म्हणाला आवडले ना खूपच चविष्ट जेवण होते आजचे अहाहा साऱ्या भाज्या सुरेख झाल्या होत्या बटाट्याची भाजी तर छानच शेवयाची खीर चटणी कोशिंबीर आमटी सारं छान झालं होतं आई तुझ्या हाताला तर वेगळीच चव आहे आज खरच माझं पोट खूप भरलंय

**(७) स्वमत.**

(अ) संध्याकाळच्या सौंदर्याचे वर्णन कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत करा.

(आ) सूर्योदयाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

AENUTB

***

# ९. तरफ

**सुरेश मथुरे** (१९३१ ते १९९८) :

कवी, कथाकार, विज्ञानलेखक, ललित गद्यलेखक. त्यांचा 'चंद्रकांत राजाची कन्या' हा ललित लेखसंग्रह; 'कॅक्टस व्हिला', 'विश्वकर्म्याचं विश्व' हे गाजलेले कथासंग्रह; 'ज्ञानवृक्षाच्या पारंब्या', 'विज्ञानाचे वाटाडे' ही विज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित आहेत.

प्रस्तुत पाठात आर्किमीडिज या शास्त्रज्ञाच्या आयुष्यातील बालपणीच्या विविध प्रसंगांतून त्याची निरीक्षणशक्ती, जिज्ञासा आणि तार्किक विचारक्षमता यांचा प्रत्यय येतो.


सिसिली बेटातील सिराक्सूस शहर. वेळ सकाळची. स्वच्छ, पिवळा सूर्यप्रकाश सगळीकडे पसरला होता. दिवस आठवड्याच्या बाजाराचा होता, म्हणून रस्त्यावरून गर्दी, गोंगाट वाहत होता. हिरव्यागार द्राक्षांच्या गासड्या भरून बैलगाड्या बाजाराकडे जात होत्या. काही काही गाड्यांमधून ऑलिव्ह फळांचे ढिगारे, हिरव्या पालेभाज्या आणि बाजारात विकण्याचे इतर जिन्नस जात होते. जाणाऱ्यांची एकच घाईगर्दी उसळली होती. सिराक्सूस शहरातील तो मुख्य चौक गर्दीने नुसता फुलून निघाला होता. चौकाभोवतीची जुनाट घरे मात्र स्वच्छ सूर्यप्रकाशात चकाकत होती. वर निळे निळे आकाश, पिवळ्या प्रकाशात उजळून निघालेली घरे आणि त्या घरांच्या मातीवर पडलेल्या काळ्या सावल्या, यांमुळे ते दृश्य फार मजेशीर दिसत होते. काही काही घरांवरच्या धुरांड्यातून धूर वळणे, आडवळणे घेत घेत वर चढत होता. कोपऱ्यावरच्या एका जुनाट घरापुढल्या बागेतल्या बाकावर एक छोटासा मुलगा मांडी घालून काहीतरी वाचत होता. कागदावर मध्येच आकृती काढून आणि त्या आकृतीकडे टक लावून पाहत तो वेड्यासारखा बसला होता. इतक्यात त्याच्यासमोर कुणीतरी उभे राहिले. त्यासरशी त्या मुलाने नजरेपुढचा कागद चोळामोळा करून खिशात घातला. मान खाली करून तो स्तब्ध उभा राहिला.

''शाऽऽ, तुला कैक वेळा सांगितले, की हे कागदावर गिचमीड गिचमीड करणे बस्स झाले!'' मुलाला तो माणूस दरडावून सांगत होता. समोरचा तो मुलगा दुसरातिसरा कोणी नसून आर्किमीडिज होता आणि तो माणूस म्हणजे त्याचे वडील होते. वडिलांसमोर मुलगा आता थोडा थरथरतच उभा होता. वडील मुलाला आणखी दम भरणार, तोच त्यांचा शेजारी फाटक उघडून आत आला. मग वडिलांनी त्या शेजाऱ्याला मुलाची गाऱ्हाणी सांगण्यास सुरुवात केली. म्हणाले, ''पाहिलंत, तालमीला जा असे मी सांगतोय याला, पण ऐकत नाही. शरीर छान झाले तर हा किती पुढे येईल? निदान काही धंदा शीक, तेही नाही. सारा दिवस हा असा बसतो कागदावर रेघा मारत. कळत नाही काय आहे त्या रेघोट्यांत एवढे!''

शेजाऱ्याला वडील आणखीही काही सांगत राहिले असते; पण तेवढ्यात आर्कीची आई तिथे आली. आपल्या मुलाला कुणी हसलेले, बोललेले तिला खपत नव्हते. ती ताडकन आर्कीच्या वडिलांना म्हणाली, ''तुम्ही आधी बाजारात जा पाहू. जा, बकरीचे दूध आणा. पोरे सकाळपासून उपाशी आहेत. दूध नाही मिळाले तर मध आणा, जा.''

बायकोचा तो अवतार पाहून आर्कीच्या वडिलांनी काढता पाय घेतला. पुन्हा आर्कीने कागदात तोंड खुपसले व तो कागदावर वृत्तचित्ती वगैरे काढू लागला. समोरच्या रस्त्यावरची वर्दळ वाढत होती. ऊन सणसणीत तापू लागले होते. एकदम जोरजोरात आरडाओरड ऐकू आली, म्हणून आर्की रस्त्यावर गेला. पाहतो तो काय, एका भल्यामोठ्या काळ्या दगडाभोवती सारे जण गोळा झाले आहेत. हातवारे करत आहेत. दगडाभोवती त्या लोकांनी खड्डा खणलेला होता. लोखंडी पहारी आणि शिगा घालून ते, तो दगड त्या खड्ड्यामधून बाहेर काढत होते; पण दगड दूर हटायला तयार नव्हता. एखादा बैल खाली अडून बसावा, तसा तो बसला होता. धावतच आर्की त्या गर्दीत गेला आणि हात उंचावून म्हणाला, ''थांबा! असा हाताने का एवढा मोठा दगड उचलला जाणार आहे? त्यासाठी तरफ तयार करायला हवी, तरफ!''

तरफ? तरफ या शब्दाचे सर्वांनाच आश्चर्य वाटले; पण आर्की त्यांच्या तोंडाकडे पाहत बसला नाही. इकडे तिकडे पाहत त्याने एक भलामोठा लाकडी वासा तयार केला. तो दगडाखाली जाईल तितका खोल खुपसला व त्या वाशाखाली लाकडाची एक गंडेरी ठेवून त्याने म्हटले, ''हं! लोकहो, या टोकापाशी लावा बळ!'' चार हात एकत्र आल्याबरोबर तो अगडबंब दगड आस्ते आस्ते सरकू लागला. सारे जण पाहतच राहिले. एखादी म्हैस तळ्यामध्ये मनसोक्त डुंबून हळूहळू



बाहेर पडावी, तसा तो दगड खड्ड्याबाहेर आला. झाडाच्या सावलीखाली एका टोकाला तो दगड हालवण्याचे कंत्राट घेतलेला इसम उभा होता. तो एकदम खूश झाला. आर्कीच्या पाठीवर त्याने थाप मारली, त्याला शाबासकी दिली. आर्कीला घेऊन तो दुसऱ्या दिवशी त्याच्या बड्या नातलगाकडे गेला. हा बडा नातलग हायरो राजाच्या दरबारी फार मोठ्या जागेवर होता. त्यालाही थोडी भूमितीबद्दल आस्था होती. हायरो राजा गुणीजनांचा चाहता होता. या बड्या माणसामुळे आर्की हायरो राजाकडे जाण्यास निघाला.

शहराच्या एका टोकाला हायरो राजाचा प्रचंड मोठा राजवाडा होता. राजरस्त्यावर दुतर्फा उंच उंच वृक्ष होते. त्या रस्त्यावरून आर्कीचे वडील आर्कीला घेऊन दरबारात जात होते, ते स्वत: हळूहळू बिचकत दचकत पावले टाकत होते आणि आर्की मात्र तसाच खिशामधून कागद काढून, कागदावरील क्लिष्ट गणितं डोळ्यांखालून घालत जात होता. वडिलांनी मागे पाहिले, की घाबरून आर्की हातातला कागद झटकन खिशात लपवून टाकी. आपण राजदरबारी जात आहोत, याचे त्याला काहीच वाटत नव्हते, त्याला खरा आनंद झाला होता, तो एकाच गोष्टीचा. तरफेच्या बाबतीत दोन टोकांना लागणाऱ्या प्रेरणा यामधल्या टेकूच्या अंतरापासून व्यस्त प्रमाणात असतात, ही त्याची कल्पना प्रत्यक्षात आली होती. त्या आनंदात तो राजदरबारात आला केव्हा, हायरो राजासमोर उभा राहिला केव्हा, हेही त्याला समजले नाही. रत्नजडित मुकुट घातलेल्या राजाकडे पाहून छोटा आर्की भांबावून गेला. राजा त्याला म्हणाला, ''मला सारा वृत्तान्त कळला आहे. अशी हुशार मुले या देशाला हवी आहेत. आजपासून तू या दरबारात राहायचे. दिवसभर अभ्यास, मनन, चिंतन, वाचन करायचे. मी तुझ्या पाठीशी आहे.'' हे पाहून दरबारातील सारे लोक आनंदाने टाळ्या वाजवू लागले व आर्कीचे कौतुक करू लागले.

(निवडक किशोर, विज्ञान खंड-१३)

**शब्दार्थ :**

**गासडी** - गठ्ठा, गठडी. **वृत्तचित्ती** - गणितातील एक संकल्पना, **पहार** - टोकदार लोखंडी दांडा.
**तरफ** - जड वस्तू उचलण्यासाठी आधाराला दिलेला दांडा. **वासा** - घराच्या छपरासाठी वापरायचा (आढ्यापासून वळचणीपर्यंत जोडलेला) लांब, जाडजूड दांडा. **गंडेरी** - लाकडाचा गोल तुकडा. **भांबावून जाणे** - गोंधळून जाणे.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ)

| आर्किमीडिजचे गुणविशेष |
|---|
| |
| |
| |
| |

(आ)

| हायरो राजाचे गुणविशेष |
|---|
| |
| |

**(२) योग्य पर्याय निवडा.**

(अ) आर्कीला हायरो राजाच्या दरबारी जाताना आनंद झाला होता, कारण.....

(१) तो त्याच्या वडिलांसोबत जात होता.
(२) त्याला कंत्राटदाराकडून शाबासकी मिळाली.
(३) तरफेच्या बाबतीतील त्याची कल्पना प्रत्यक्षात आली.
(४) बड्या नातलगालाही भूमितीचे ज्ञान होते.

(आ) असत्य विधान शोधा.

(१) सिराक्सूस शहर सिसिली बेटावर वसलेले आहे.
(२) सकाळचा सूर्यप्रकाश सर्वत्र पसरलेला होता.
(३) मुख्य चौक गर्दीने फुलून गेला होता.
(४) रस्त्यावर अजिबात रहदारी नव्हती.

**(३) खालील शब्दांसाठी आलेली पाठातील विशेषणे शोधा व लिहा.**

(अ) ☐ घरे
(आ) ☐ सूर्यप्रकाश
(इ) ☐ गणित
(ई) ☐ मुकुट
(उ) ☐ दगड

**(४) 'छोटा' पासून 'छोटासा' हा शब्द तयार होतो तसे खालील शब्दांना 'सा' प्रत्यय लावून शब्द तयार करा व लिहा.**

(अ) लहान ☐
(आ) बारीक ☐
(इ) पुरे ☐
(ई) नाही ☐

**(५) खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधा.**

(अ) टक लावून बघणे–
(१) टकटक करणे.
(२) एकसारखे बघणे.
(३) लक्ष ठेवून असणे.

(आ) काढता पाय घेणे–
(१) दूर जाणे.
(२) निघून जाणे.
(३) वहाणा काढणे.

(इ) भांबावून जाणे–
(१) गोंधळून जाणे.
(२) उदास होणे.
(३) विचारमग्न होणे.

(ई) गाऱ्हाणी सांगणे–
(१) स्तुती करणे.
(२) तक्रारी करणे.
(३) चुगली करणे.

**(६) अचूक शब्द ओळखून लिहा.**

(अ) वडीलांसोबत/वडिलांसोबत/वडिलानसोबत/वडीलानसोबत

(आ) तालमिला/तालमीला/ताल्मीला/ताल्मिला

(इ) गारहाणी/गाऱ्हाणि/गाऱ्हाणी/ग्राहाणी

**(७) खाली दिलेल्या वाक्यांतील क्रियापदे ओळखा व अधोरेखित करा.**

(अ) तो बघ मोर, किती सुंदर!

(आ) मुलांनी टाळ्या वाजवल्या.

(इ) वैष्णवी सुंदर चित्र काढते.

(ई) शिक्षकांनी मुलांना प्रश्न विचारले.

**(८) खाली काही म्हणी व त्यांचे अर्थ दिले आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) अति तिथे माती | (१) सर्वांचा विचार घ्यावा; परंतु आपणांस योग्य वाटेल ते करावे. |
| (आ) थेंबे थेंबे तळे साचे | (२) कोठेही गेले तरी मनुष्यस्वभाव सारखाच असतो. |
| (इ) पळसाला पाने तीनच | (३) थोडे थोडे जमवत राहिले म्हणजे कालांतराने मोठा संचय होतो. |
| (ई) ऐकावे जनाचे, करावे मनाचे | (४) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो. |

**(९) स्वमत.**

(अ) पाठातील भलामोठा दगड हलवण्याच्या प्रसंगाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) आर्किमीडिजच्या जागी तुम्ही असता, तर त्या वेळी तुम्ही खड्ड्यातील दगड हटवण्यासाठी काय केले असते, त्याची कल्पना करा व लिहा.

**उपक्रम :**

खालील तक्त्यातील शास्त्रज्ञांची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने शोधा व तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र. | शास्त्रज्ञ | देश | त्यांचा शोध | शोधाचा फायदा |
|---|---|---|---|---|
| (१) | गॅलिलिओ | | | |
| (२) | जेम्स वॅट | | | |
| (३) | सी. व्ही. रामन | | | |
| (४) | डॉ. जयंत नारळीकर | | | |
| (५) | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम | | | |

***

AEXQUY

# १०. डासपीटिका

**अनिल अवचट** (१९४४) :

प्रसिद्ध लेखक, समाजसेवक, चित्रकार, पत्रकार. त्यांचे लेखन हे विश्लेषणात्मक आहे. त्यातून मानवी संबंधांचे, समाजव्यवहाराचे, एकूण मानवी वर्तनाचे चिंतन आणि त्याविषयीचे आकलन यांचे मनोज्ञ दर्शन घडते. त्यांचे 'पूर्णिया' हे पहिले पुस्तक बिहारचे समाजदर्शन घडवते. त्यांची 'वेध', 'अंधेरनगरी निपाणी', 'छेद', 'संभ्रम', 'माणसं', 'कोंडमारा' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

प्रस्तुत पाठात डास आणि माणूस यांच्यातील संवादाच्या आधारे डासांसारख्या कीटकांनाही माणसासारख्या भावभावना असतात, अशी कल्पना करून विनोदी शैलीत लेखकाने वर्णन केले आहे.

त्या माणसाला बाकी काही प्रश्न नव्हते. तो सगळीकडे जमवून घेणारा माणूस होता. फक्त त्याची एकच अपेक्षा असे, की रात्री निवांत झोपता यावे; पण ते डास तेवढीही इच्छा पुरी होऊ देत नसत. त्याला काय म्हणावे? हा झोपला, की झालीच त्यांची गुणगुण सुरू. संध्याकाळीच खोलीची दारं, खिडक्या बंद ठेवून पाहिली. अंगाला मलम चोपडून, डासांना हटवण्यासाठीची अगरबत्ती जाळून, सगळं करून झालं. डास दाद देईनात. पंखा लावल्यावर मात्र जरा शांतता मिळू लागली; पण त्या ढणढण पंख्याचाही त्रास. अपरात्री जाग यायची. तो पंखा बंद करून टाकायचा. उकडायला लागलं, की दारं, खिडक्या उघडायचा. पंखा सुरू केला, तरी आलेले याचक काय सोडणार होते त्याला?

इकडे डास जमातीतही याची चर्चा व्हायची. कसला हा चिंगूस माणूस? काही थेंब रक्तासाठी केवढा भाव खातोय. रक्तदानाच्या वेळी अर्धा लीटर रक्त काढतात म्हणे, तेही दोन दिवसांत भरून येतं. जैसे की तैसे. एवढ्या रक्त तयार करणाऱ्या फॅक्टऱ्या हाडाहाडांच्या पोकळीत दडवून ठेवल्यात. आम्हां गरिबांना चार थेंब देताना याचा हात का आखडतो? हा मात्र कुठल्याही झाडांची फळं तोडतो. कुठल्याही नदीचं पाणी पितो. किती प्राणी मारून खातो. हे चालतं कसं?




माणूस हे ऐकत होता. तो म्हणाला, ''माझी झोप उडवता आणि वर हे? माझं संरक्षण करायचा हक्क आहे मला. मी तुम्हांला मारणारच. ते माझं जैविक कर्तव्य आहे.''

बोलणंच खुंटलं!

डास म्हणाला, ''तुझ्यातलं रक्त काढणं हेही आमचं जैविक कर्तव्य आहे.''

दासू आणि दासी हे डासांमधलं एक सुजाण कुटुंब होतं. ते इतर डासांना म्हणालं, ''आपला जन्माचा संसारसंबंध. बोलणं तोडून कसं चालेल?''

इतरांनी मग बोलणी करायला त्यांची नियुक्ती केली. त्यांनी माणसाला विचारलं, ''तुझा नेमका काय प्रॉब्लेम आहे? रक्ताचं नुकसान फारसं मोठं नाही. काही मिनिटांतच ते भरून येतं आणि तू खाकरतोस, शिंकतोस. त्यातून जातात की कितीतरी प्रोटिन्स, मग रक्ताचंच का एवढं घेऊन बसला आहेस?''

''कारण रोगप्रसार...'' माणसाने जरा हटके मुद्दा काढला. दासी म्हणाली, ''बरं का भाऊजी, आमच्या पोटात शिरणारे जंतू तुमच्या शरीरात शिरतात, त्याला आम्ही काय करायचं? पण सर्वच डासांमुळे रोगप्रसार होत नाही. काही जमाती आहेत आमच्यात तशा. झोपेत तुमच्या अंगात आम्ही सुई खुपसतो. ते फार दुखतं का? ती काळजी आम्ही घेतो. आणखी घेत राहू. आमच्या मुलांना विशेष ट्रेनिंग देऊ. झालं?''



''आणि तुमची ती गुणगुण? तुम्हांला तुमचं नरडं बंद नाही ठेवता येत? अगदी संताप येतो अशा वेळी.''

दासू म्हणाला, ''दादा, सेकंदात शेकडो वेळा पंख हलवावे लागतात, तेव्हा कुठे उडू शकतो आम्ही. त्याचा आवाज काय करणार?'' त्यांच्या बोलण्यातून फारसे निष्पन्न झाले नसले, तरी कटुता कमी झाली होती.

डासांनी मग त्यांची जनरल बॉडी मीटिंग ठेवली. दासू-दासीचा अहवाल सगळ्यांनी ऐकला. सगळे गंभीर झाले. विचारविनिमय सुरू झाला. त्यांच्यातला एक डॉक्टर संशोधक पुढे आला. म्हणाला, ''मी एक लोकल ॲनेस्थेशिया देणारं रसायन शोधलंय. आपल्या सुईवर ते लावायचं, की ती खुपसलेली त्याला कळायचंही नाही.''

सगळ्यांच्या तोंडून एकदम 'वा!' असा उद्‌गार बाहेर पडला. डास पुढाऱ्यानं त्याला विचारलं, ''त्याचं पेटंटबिटंट काही नाही ना?''

''छे छे, तसं करायला आपण माणसं का आहोत?'' हशा उसळला.

तो पुढे म्हणाला, ''ज्या वनस्पतीपासून ते रसायन मिळतं, त्या मुबलक आहेत आणि त्यांनी सहकार्य करायचं कबूल केलंय. शिवाय, आपल्या शरीरातल्या त्या जंतूंसाठी आपणच ती ॲंटिबायोटिक्स घेतली तर? आता राहता राहिला प्रश्न आपल्या गुणगुणीचा. माझे त्यावर प्रयोग सुरू आहेत.''

म्हातारा डास म्हणाला, ''माणसाला ऐकू येतं ते कानानं. तो कान टाळला की झालं. गाल आहेत, कपाळ आहे. शक्यतो पाय पकडा. प्रश्न सुटेल.''

आणि मग ते सहकार्य पर्व सुरू झालं.

एक पहिली छान झोप झाली, की दुरून गुणगुणणं ऐकू आलं तरी त्याला चालतं. आता तो डासांच्या त्या गुणगुणीत संगीत शोधू लागला आहे. एकदा सकाळी त्याला त्याचा तरुण पुतण्या म्हणाला, ''तुमच्या चेहऱ्यावर डास चावल्याच्या किती खुणा आहेत. आरशात बघा एकदा.''

माणूस हसून म्हणाला, ''तुझ्या चेहऱ्यावर जशा तारुण्यपीटिका आहेत ना, तशा माझ्या चेहऱ्यावर आहेत डासपीटिका. छान दिसतात ना त्या?'' पुतण्याच्या चेहऱ्यावर असे भाव उमटले, की आता याला काय म्हणावं?

(सरल-तरल)

**शब्दार्थ :**
**जैविक** - जिवासंबंधी. **सुजाण** - शहाणा. **कटुता** - कडवटपणा.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ)

डासांचा त्रास वाचवण्यासाठी केलेले उपाय

(आ)

डासांच्या मते, माणूस करत असलेल्या चुकीच्या गोष्टी

**(२) खाली दिलेल्या इंग्रजी शब्दांचे मराठीतील अर्थ लिहा.**

(१) फॅक्टरी (२) प्रोटिन्स (३) मीटिंग (४) प्रॉब्लेम (५) ट्रेनिंग

**(३) पाठातून शोधून लिहा.**

(अ) डासांची संवेदनशीलता दाखवणारी वाक्ये.

(आ) डासांनी माणसाच्या वाईट गोष्टींवर केलेली टीका दर्शवणारे वाक्य.

**(४) माणसाला चावल्यानंतर त्रास होऊ नये म्हणून डासांनी सुचवलेले उपाय.**

**(५) समानार्थी शब्द लिहा.**

(१) नदी (२) रात्र (३) झोप (४) संताप

**(६) कंसात दिलेल्या अव्ययांचा वापर करून रिकाम्या जागा भरा व त्या अव्ययांचा प्रकार ओळखा.**

(वर, नेहमी, तर, अबब, मागे, सावकाश, कारण, शाबास)

(१) रवी वाचताना ............ अडखळतो.

(२) सूर्य ढगा ............ लपला आहे.

(३) प्रयत्न केला, ............ यश नक्की मिळेल.

(४) ............ ! केवढी ही इमारत.

(५) रस्त्यातून जाताना ............ व जपून चालावे.

(६) पतंग ............ जात आहे.

(७) मी काल शाळेत आलो नाही ............ माझी तब्येत ठीक नव्हती.

(८) ............ ! आज तू खूप चांगले काम केलेस.

**(७) स्वमत.**

(१) पाठातील डास आणि माणूस यांच्यातील संवादाच्या आधारे डासांचे म्हणणे तुमच्या शब्दांत लिहा.

(२) दासू आणि दासी यांनी इतर डासांशी केलेल्या चर्चेचा तपशील लिहून, त्यातून निष्पन्न झालेली गोष्ट सांगा.

**उपक्रम :** या पाठाचे नाट्य रूपांतर करून वर्गात सादर करा.

AF7LHL

***

# ११. हा देश माझा

**सेनापती बापट** (१८८० ते १९६७) :

पांडुरंग महादेव बापट उर्फ सेनापती बापट हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिक होते. मेकॅनिकल इंजिनिअर होण्यासाठी ते इंग्लंडला गेले. तेथे असताना भारतीय स्वातंत्र्याविषयी आस्था निर्माण झाल्याने शिक्षण अर्धवट सोडून ते मायदेशी परतले आणि स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाले. नंतर पुणे जिल्ह्यातील मुळशी धरणग्रस्तांसाठी त्यांनी आंदोलन पुकारले. तेव्हापासून ते 'सेनापती' म्हणून ओळखले जाऊ लागले. 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ', 'गोवामुक्ती संग्राम' या चळवळींमध्ये त्यांनी स्वत:ला झोकून दिले. सेनापती बापट यांनी विपुल लेखन केले असून त्यांचे लेखन बव्हंशी पद्यात्मक आहे.

प्रस्तुत कवितेत भारत देशाबद्दलचे प्रेम, भारतातील निसर्गसौंदर्य, विविधतेतील एकता यांचे वर्णन कवीने केले आहे. देशविघातक कृत्ये करणारे हात देशकार्याकडे वळावेत, अनेक धर्म, अनेक जाती असल्या तरी माणुसकीचे नाते जपावे, असा संदेश या कवितेतून कवीने दिला आहे.

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ।।धृ।।

हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ।।१।।

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ।।२।।

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणसुकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंकारे एक तुतारी
संदेश रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे ।।३।।



**शब्दार्थ :**

**भान असणे** – जाणीव असणे . **अभिलाषा** – तीव्र इच्छा. **स्फुरण** – जोश. **बाहू** – हात. **उत्पात** – अनर्थ, संकट, विघातक कृत्य. **अभंग** – न तुटणारे. **ललकारी देणे** – गर्जना करणे. **तुतारी** – एक रणवाद्य. **रोष** – राग.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **देशाचे मोठेपण सांगणाऱ्या कवितेतील गोष्टी**

(आ) **कवीने उल्लेख केलेल्या करायच्या गोष्टी**

**(२) योग्य पर्याय निवडा.**

(१) तुमचे बाहू स्फुरण पावू द्या, ..............

(अ) दुसऱ्याला मदत करण्यासाठी.

(आ) समाजकार्य करण्यासाठी.

(इ) देशाकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी.

(ई) देशातील लोकांना सामर्थ्यशाली बनवण्यासाठी.

(२) कवीच्या मते उत्सुकलेल्या हातांनी काय करावे ?

(अ) शैक्षणिक कार्याला प्रोत्साहन द्यावे.

(आ) देशाच्या प्रगतीसाठी कार्य करावे.

(इ) सत्कार्याला प्रोत्साहन द्यावे.

(ई) हातांची उत्सुकता तशीच ठेवावी.

**(३) देशातील विविधता दर्शवणारी कवितेतील ओळ शोधून लिहा.**

**(४) एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) कवीने जपायला सांगितलेली गोष्ट–

(आ) सर्वदूर ललकारी देण्यासाठी वापरायचे साधन–

**(५) खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचे नाव | कवी | कवीने उल्लेखलेल्या नैसर्गिक गोष्टी | कवितेची मध्यवर्ती कल्पना |
|---|---|---|---|
| | | | |

**(६) स्वमत.**

(अ) कवितेतून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) 'स्वत:चे सामर्थ्य देशहितासाठी वापरा' याविषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.

**उपक्रम :**

(अ) 'हा देश माझा' ही कविता वर्गात तालासुरात सादर करा.

(आ) देशभक्तीपर गीतांच्या ध्वनिफिती मिळवून ऐका. देशभक्तीपर गीतांचा संग्रह करा.

ARKVD6

***

# १२. मोर

**पां. पि. घरत** (१९३१) :

ज्येष्ठ लेखक. त्यांची 'आपली वनश्री आपले वैभव', 'आपल्या लोकमाता आणि पिके', 'महानशिष्य एकलव्य', 'नेहरू नक्षत्रालय', 'आई आली आहे', 'आदिवासींच्या माता', 'भूमातेचा कोप भूकंप', 'हिरवे सोने', 'महाराष्ट्र देश महान', 'वन्य पशुविषयक समज गैरसमज' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

प्रस्तुत पाठात लेखकाने वन्य पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती असून आपण त्यांचे रक्षण करायला हवे असा संदेश दिला आहे. तसेच मोर या पक्ष्यास 'राष्ट्रीय पक्षी' हा किताब कसा मिळाला यामागील इतिहास उलगडून दाखवला आहे.



आपल्या देशात हजारो पक्षी असताना, पक्ष्यांचा राजा म्हणून निवड होण्याचा मान मोरालाच का मिळाला, अशी शंका अनेकांच्या मनात आली असेल. राष्ट्रीय पक्षी म्हणून भारत सरकारने मोर या पक्ष्याला मान्यता दिली याच्यामागे थोडासा इतिहास आहे.

काही वर्षांपूर्वी जपान देशातील टोकियो या शहरात पक्षी संरक्षणविषयक विचार करण्यासाठी जगातील सर्व देशांचे प्रतिनिधी जमले होते. या प्रतिनिधींच्या सभेत, प्रत्येक देशाने आपापल्या देशातील एक विशिष्ट पक्षी पसंत करून त्याला राष्ट्रीय पक्षी (पक्ष्यांचा राजा) असा मान द्यावा असे सर्वानुमते ठरवण्यात आले.

या सूचनेचा उद्देश असा होता, की वन्य पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे, तिच्या रक्षणाकडे आम जनतेचे लक्ष वेधावे. या सूचनेप्रमाणे सरकारने वन्य पशूंचे रक्षण करण्यासाठी नेमलेल्या समितीने या प्रश्नाचा सांगोपांग विचार केला. प्रत्येक राज्याचे अभिप्राय मागवले. वृत्तपत्रांतून अभिप्राय मागवण्यात आले आणि अशा रीतीने अनेक पक्ष्यांची नावे राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आली. त्यात गरुड, हंस, महासारंग आदी पक्ष्यांचीही नावे होती. अनेक पक्ष्यांच्या नावांतून एक नाव निवडण्यासाठी अनेक कसोट्या लावण्यात आल्या. त्या सर्व कसोट्यांत मोर उत्तीर्ण झाला आणि 'राष्ट्रीय पक्षी' म्हणून त्याची निवड करण्यात आली.

या कसोट्या लावताना ऐतिहासिक प्रणाली, काव्याची पार्श्वभूमी, लोकांची आवड इत्यादी बाह्य कारणांबरोबरच रंग, शरीरसौष्ठव, कलात्मकता, कंठस्वर आदी पक्षी वैशिष्ट्यांचाही विचार करण्यात आला आणि त्यात 'राष्ट्रीय पक्षी' हा मानाचा किताब देण्यास 'मोर' हाच पक्षी योग्य आहे, असे ठरवण्यात आले.

भारतातील एक हिमालय प्रदेश सोडला, तर भारतात सर्व प्रदेशांत मोर पहायला मिळतो. भारत हा प्रामुख्याने उष्ण कटिबंधाचा प्रदेश असल्याने मोर भारतात सर्वत्र पहायला मिळतो. आशिया खंडाच्या इतरही देशांत मोराचे थोड्या फार प्रमाणात वास्तव्य आहे. ब्रह्मदेशात मोराला राष्ट्रीय पक्षी म्हणून मान दिला आहे; परंतु १९४७ सालापूर्वी ब्रह्मदेश हा भारताचाच भाग समजला जात होता. तेथील चालीरीती थोड्याफार फरकाने भारताप्रमाणेच आहेत.

मोर हा कोंबडीच्या जमातीतील पोटजातीचा पक्षी आहे. या जातीतील पक्षी लांब असतात आणि त्यांना नखे असतात. मोर मुख्यत: लांब लांब ढांगा टाकत चालत अंतर कापतात आणि जमिनीवर अंडी घालतात. तितर आणि बटेर त्याच्या दूरच्या नात्यातले आहेत, तर कोंबडा त्याचा जवळचाच भाईबंद आहे. ब्रह्मदेश आणि आग्नेय आशियातही मोर आढळतात; पण त्याच्या रंगात निळ्याऐवजी हिरव्या छटा जास्त असतात आणि शेपटी थोडी खाकी रंगाची असते.

कांगो आणि आफ्रिकेमध्ये आढळणाऱ्या मोराची मान निळ्या-जांभळ्या रंगाची असते. हिमालयाच्या पूर्व भागात

राखाडी रंगाचे मोर आढळतात. त्यांच्या पंखांवर हिरव्या रंगाचे डोळे असतात. काही प्राणिसंग्रहालयांत पांढऱ्या रंगाचे मोर पहायला मिळतात; पण हे मोर खरे निसर्गदत्त नसून जपानी शास्त्रज्ञांनी तयार केलेली ही संकरित जात आहे. अलीकडे तर अर्धा रंग निळा किंवा पांढरा अशा रंगांच्या मोराच्या जाती तयार केल्या आहेत.

ज्या ठिकाणी माणसाची वहिवाट नसेल अशा अडगळीच्या सुरक्षित जागी एक खड्डा खणून लांडोर त्यात अंडी घालते. मोराच्या घरट्यात साधारणपणे ४ ते १० अंडी सापडतात. ही अंडी आकाराने कोंबडीच्या अंड्याच्या दुप्पट मोठी असतात. साधारणपणे एक महिन्यात लांडोर आपली अंडी उबवते.

अंड्यातून पिल्लू बाहेर आले, की लांडोर त्यांना दोन दिवस आपल्या अंगाखाली ठेवते. पाच-सहा पिले निघाली, की बाकीची अंडी तशीच टाकून लांडोर आपल्या पिलांना घेऊन गवताळ अथवा झुडपाच्या जागी लपून बसते. तिथे जवळ जवळ पंधरा दिवस किंवा पिलांना उडता येईपर्यंत ती राहते. शत्रूपासून पिलांना त्रास होऊ नये म्हणून ती फार सावध असते. तरीही शत्रू लांडोरीला फसवून त्यांतली ३-४ पिले तरी खातोच. मोर या वेळी लांडोरीजवळ राहत नसल्याने लांडोरीला पिलांचे संरक्षण करावे लागते.

मोराचा केकारव वर्षा ऋतूचे आगमन सुचवणारा आहे. ग्रीष्म ऋतू संपता संपता उष्णता असह्य होते. त्या वेळी येणारा वर्षासूचक केकारव शेतकऱ्यांमध्ये नवीन आशेचा संचार करतो. ती लवकरच येणाऱ्या पावसाची पूर्वसूचना असते. वर्षा ऋतू हा आनंदाचा काळ आहे. तळ्याची पाळ, हिरवीगार कुरणे, देवालयाची उंच शिखरे, नदी-नाले, ओहोळाचे काठ ही या वेळी मोराच्या स्वैर विहाराची स्थाने असतात. मोर नेहमी आपल्या निवासस्थानापासून अर्धा ते दोन किलोमीटरच्या परिसरात वावरतो. चारा सापडेल त्याप्रमाणे तो फिरतो. तो आपला चारा दिवसाच शोधतो. काळोख पडण्यापूर्वी तो आपल्या जागेवर येऊन पोहोचतो.

पहाट होताच मोर जागा होतो. ज्या झाडावर त्याने झोप घेतली असेल तिथूनच बसल्या बसल्या तो बांग देतो. थोडा वेळ आपले पंख सावरून तो वरून खाली टेहळणी करतो. सूर्योदयापूर्वी अर्धा तास तो झाडाखाली उतरतो. पाळीव मोर असेल, तर ज्या ठिकाणी लोक त्याला दाणे घालत असतात त्या ठिकाणी न चुकता तो नेमक्या वेळी येतो.

इतर अनेक पक्ष्यांपेक्षा मोर मनुष्याच्या अगदी जवळ येऊ शकतो. सकाळी किंवा संध्याकाळी अंगणात दाणे टिपण्यासाठी येणारा मोर, लहान मुलाच्या हातून केव्हा दाणे खाऊ लागतो, ते ध्यानीसुद्धा येत नाही.


मोराला राष्ट्रीय पक्ष्याचे स्थान दिल्याने त्याची जोपासना व्हावी. मोराला राष्ट्रीय पक्ष्याचे स्थान प्राप्त झाल्याने आपल्या भारतवर्षात पक्ष्यांविषयी प्रेम वाढीस लागेल अशी आशा वाटते.

(निवडक किशोर, ललित सृष्टी खंड-९)


**शब्दार्थ :**
**सांगोपांग** - सर्व बाजूंनी/अंगाने. **कसोटी** - परीक्षा. **निसर्गदत्त** - निसर्गाने दिलेले, नैसर्गिक. **केकारव** - मोराचा आवाज. **पाळ** - तळ्याच्या काठाकाठाने बांधलेली उंच, रुंद भिंत. **टेहळणी करणे** - दुरून पाहणी करणे, नजर ठेवणे.

## कृती

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.**



(२) 'राष्ट्रीय पक्षी' हा मानाचा किताब मिळवण्यासाठी मोराकडे असलेली पक्षीवैशिष्ट्ये.



(३) कंसातील योग्य पर्याय शोधा व लिहा.

(अ) ............ मोर सापडत नाही. (आग्नेय आशियात, ब्रह्मदेशात, हिमालयात)


(आ) मोर हा ............ पोटजातीचा पक्षी आहे. (कोंबडीच्या, शहामृगाच्या, बदकाच्या)

(४) एका शब्दात उत्तर लिहा.

(अ) मोराच्या ओरडण्याला म्हणतात – ☐

(आ) मोराचा आनंदाचा काळ – ☐

(५) मोराच्या दैनंदिनीचा ओघतक्ता बनवा.




(६) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) आफ्रिकेत आढळणारे मोर | (१) हिरव्या छटांचे |
| (आ) हिमालयाच्या पूर्वभागात आढळणारे मोर | (२) निळ्या, जांभळ्या रंगांचे |
| (इ) आग्नेय आशियात आढळणारे मोर | (३) राखाडी रंगाचे |

(७) वैशिष्ट्ये लिहा.

(अ) ब्रह्मदेशातील मोर

(१) ......................

(२) ......................

(आ) हिमालयाच्या पूर्व भागात आढळणारे मोर

(१) ......................

(२) ......................

**(८) कारणे शोधा आणि लिहा.**

(अ) लांडोरीला पिलांचे संरक्षण करावे लागते, कारण ................

(आ) मोराला 'राष्ट्रीय पक्षी' होण्याचा मान मिळाला, कारण ................

**(९) खालील माहिती वाचून त्याआधारे तक्ता पूर्ण करा.**

**क्रियापदांचे काळ**

**क्रियापद** (१) क्रियेचा बोध होतो.

(२) क्रिया कोणत्या वेळी घडली याचा बोध होतो.

**लक्षात ठेवा :** क्रियापदावरून क्रिया घडण्याच्या वेळेचा जो बोध होतो त्याला 'काळ' असे म्हणतात.

काळाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

(१) वर्तमानकाळ (२) भूतकाळ (३) भविष्यकाळ

| काळ | वैशिष्ट्य | वाक्य |
|---|---|---|
| **वर्तमानकाळ** | क्रियापदाच्या रूपावरून क्रिया घडते आहे असे समजते. | मी अभ्यास करतो. |
| **भूतकाळ** | क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पूर्वी घडून गेली आहे असे समजते. | मी अभ्यास केला. |
| **भविष्यकाळ** | क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पुढे घडणार आहे असे समजते. | मी अभ्यास करीन. |

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| खेळणे | खेळतो | खेळलो | खेळेन |
| बघणे | .......... | बघितले | .......... |
| करणे | .......... | केले | .......... |
| खाणे | खातो | .......... | खाईन |
| वाचणे | वाचतो | .......... | .......... |

**(१०) स्वमत.**

(१) 'वन्य पशुपक्षी' ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे, या विधानाबद्दल तुमचे विचार लिहा.

(२) 'राष्ट्रीय पक्षी' असा मानाचा किताब देण्यास मोर योग्य पक्षी आहे, याबाबत तुमचे मत सकारण स्पष्ट करा.

**उपक्रम :** आंतरजालाच्या साहाय्याने तुम्हांला आवडणाऱ्या पक्ष्यांची अधिक माहिती मिळवा व त्या माहितीचा संग्रह करा.

***

ARURET

# १३. मॉरिशस : सागरदर्यातले साखरबेट

**दत्ता नायक** (१९५४) :

सुप्रसिद्ध लेखक. गोव्यातील एक उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते. त्यांनी मराठी, कोंकणी आणि इंग्रजी भाषेतून ग्रंथ निर्मिती केली आहे. त्यांची 'आत्मदिपो भव', 'जाय काय जूय ?', 'अनकॉमन वेल्थ', 'अरेबियन डेज', 'कालीघाट ते करुणाघाट', 'द जंगल स्कूल' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'जाय काय जूय ?' या कोंकणी लघुनिबंध संग्रहाला साहित्य अकादमीचा २००६ चा पुरस्कार मिळाला आहे.

प्रस्तुत पाठात लेखकाने बहुरंगी निसर्गसौंदर्य लाभलेल्या मॉरिशस बेटाचे वर्णन केले आहे. मॉरिशस देशातील घरे व वास्तुशिल्प हे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तेथील लोकांच्या श्रमप्रतिष्ठेचे वर्णनही प्रस्तुत प्रवासवर्णनपर पाठातून वाचायला मिळते.

भारतीय महासागराच्या अथांग दर्यात जिथे नैऋत्य मान्सूनचे ढग जन्माला येतात, तिथे सागरदर्यात एक साखरबेट आहे. हजारो वर्षांआधी महासागराच्या गर्भात झालेल्या भूकंपाच्या विस्फोटातून हे बेट पाण्यावर तरारून आले. सुमारे पाचशे वर्षांपूर्वी म्हणजे सोळाव्या शतकापर्यंत मानवाचे पाऊल या बेटावर पडले नव्हते. पोर्तुगीज नाविक वास्को द गामाच्या नेतृत्वाखाली खलाशांचा तांडा आफ्रिका खंडाला वळसा घालून ईशान्येच्या दिशेने भारताच्या शोधासाठी वळला, तेव्हा हे बेट त्यांना दिसले. पोर्तुगीज या बेटावर थांबले नाहीत; पण पुढे पोर्तुगालहून गोव्याकडे येताना त्यांची जहाजे या बेटावर थांबत. सन १६३८ मध्ये डच लोक इथे पोहोचले. आपला राजपुत्र मॉरिस-द-नासाव याच्या नावावरून त्यांनी या बेटाचे नाव 'मॉरिशस' असे ठेवले. डच लोकांनी या बेटावर उसाची लागवड केली. त्यानंतर फ्रेंच लोकांचे लक्ष या बेटाकडे गेले आणि त्यांनी डचांकडून या बेटाचा कब्जा घेतला. फ्रेंचांनी उसाची लागवड वाढवली आणि मॉरिशसमध्ये साखरेचे कारखाने काढले. ब्रिटिशांनी फ्रेंचांकडून मॉरिशस बेट १८१० मध्ये जिंकले.

पोर्ट लुई ही मॉरिशसची राजधानी. तिथे कुलीघाट आहे. पोर्ट लुईच्या बंदरात जिथे भारतीय लोक उतरले, तोच हा कुलीघाट! कलकत्ता (कोलकाता), मद्रास (चेन्नई), मुंबई बंदरावरून जे लोक पोर्ट लुईच्या बंदरात उतरले, त्यातील कोणीच भारतात परतले नाहीत. ते सर्वजण मॉरिशसमध्ये स्थायिक झाले. आपल्या रक्ताने, घामाने त्यांनी उसाचे मळे शिंपले. त्यांची घरे, त्यांची नातीगोती दूर कोकणात, उत्तर प्रदेशात, बिहारात, बंगालात राहिली. नाती तुटली. ते आडनावे विसरले. त्यांनी नवी नावे घेतली. मॉरिशस हा संस्कृतींचा एक मेल्टिंग पॉट झाला. चित्रविचित्र मॉझाइक झाला. अष्ट दिशांतल्या लोकांनी हातात हात घालून काम केले. त्यांच्या श्रमाने देश समृद्ध झाला. १२ मार्च १९६८ या दिवशी मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या भूमीच्या बहुरंगी निसर्गसौंदर्याला शोभेल असा लाल, निळा, पिवळा आणि हिरवा असा चौरंगी ध्वज मॉरिशसने निवडला. कालांतराने काही पिढ्यांपूर्वी मॉरिशसच्या भूमीवर पाय ठेवलेल्या भारतीय लोकांचे वंशज मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष झाले. इतिहासाची एक परिक्रमा पूर्ण झाली.



मॉरिशसमध्ये आज ५२ टक्के लोक भारतीय वंशाचे आहेत. उर्वरित फ्रँको-मॉरिशन, अ‍ॅफ्रो-मॉरिशन आणि अँग्लो-मॉरिशन आहेत. भारतीय लोकांनी हजारो मैल दूर स्थलांतर करूनही आपल्या ओठांतली भाषा सोडली नाही. भारतातून होड्यांत बसून मॉरिशसमध्ये गेली ती भारतातील केळी! मॉरिशसमधल्या प्रत्येक भारतीयाच्या घरापुढे केळी असते. जर्द हिरव्या पानांनी अलंकृत आणि रसरशीत पिक्या केळींनी जडभारित केळ मॉरिशसमधल्या दर भारतीय घराला त्याचे भारतीयत्व देत असते.

मॉरिशसला पोहोचलो तेव्हा नुकतीच पहाट होत होती. आभाळाच्या घुमटाखाली पक्ष्यांची काकडआरती चालली होती. रात्रभर जागरण करून आता आताच सुस्त झोपलेल्या उसाच्या मळ्याच्या केसांतून थंडगार वारा आपली मऊ बोटे प्रेमाने फिरवत होता. डोंगरावरची छोटी छोटी घरे डोळे चोळत नुकतीच जागी होत होती. कमळाच्या पाकळीवर भुंगा अलगद बसावा, तसे आमचे विमान मॉरिशसच्या भूमीवर उतरले; पण विमानतळ कुठे होते? चोहीकडे उसाचे मळेच मळे होते. जणू आमचे विमान उसाच्या हिरव्यागार मळ्यांतच उतरले होते!

'वन पर्सेन्ट लॅन्ड अॅन्ड नाइन्टी नाईन पर्सेन्ट फन' ही मॉरिशसची पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी असलेली स्लोगन आहे. तिला स्मरून मॉरिशसमध्ये अक्षरश: पृथ्वीवरचा स्वर्ग निर्माण केला आहे. मॉरिशस बेटावर लहानसे आणखी एक बेट आहे. त्याचे नाव इलो सर्फ. आम्ही एका मोटरबोटीत बसून या बेटावर गेलो. इलो सर्फ बेटावर समुद्राचे स्वच्छ पाणी आत येऊन त्याच्या निळ्या पाण्याचा एक लगून निर्माण झाला आहे, तो पोहायला अतिशय सुरक्षित आहे. त्यामुळे त्या लगूनमध्ये माझी छोटी मुले चिराग, दमी आणि माझी भाची चंदाराणी यांच्यासमवेत मी मनसोक्त पोहलो. तिथेच स्पीड बोटीत बसून आम्ही इलो सर्फ बेटाला प्रदक्षिणा घातली, त्यानंतर पॅराशूटच्या मदतीने आम्ही आभाळात पॅरासेलिंगही केले. त्यानंतर दिगंतरातून दर्यातरंगांत जाण्याचा क्षण आला. आम्ही ऑक्सिजन मास्क घालून समुद्राच्या पाण्यात उतरलो. समुद्राच्या तळाची नयनमनोहर जलसृष्टी आणि मत्स्यसृष्टी पाहिली. कोरल हा समुद्राच्या पोटातला नैसर्गिक चमत्कारच म्हटला पाहिजे. कोरल ही दिसायला वनस्पती दिसते; पण तो जलजीव आहे.

मॉरिशसमधील घरे पाहणे हा एक आगळा अनुभव आहे. देशातील घराचे वास्तुशिल्प म्हणजे त्या देशातील संस्कृतीचा आरसाच असतो. मॉरिशसच्या घराचा आकृतिबंध होडीसारखा आहे. जणू आता नांगरलेल्या या घरांचा दोरखंड सुटून ही तरंगणारी घरे खोल समुद्रात जलसफरीस जाणार आहेत, असे वाटावे!

बहुतेक घरांच्या भिंतींना पांढरा रंग असतो; पण घरांना हिरवी, निळी, लाल छपरे असतात. घरांतून कांगारूंच्या पिलासारख्या खिडक्या बाहेर डोकावतात. घरापुढे सुंदर फुलझाडांचे परसू असते. त्यामध्ये छोटेसे तळे आणि तळ्यात लाल, निळी कमळे फुललेली. काही घरे बंद असतात. डोळे मिटून समाधीत बसलेल्या संन्यस्त ऋषीप्रमाणे खिडक्या-दारे बंद करून ती बसलेली असतात; पण कुठलेच बंद घरही कुरूप, भग्न अवस्थेत आहे असे मला दिसले नाही. 'हे घर विक्रीस आहे' किंवा 'हे घर भाड्याने देणे आहे' अशा पाट्याही मला मॉरिशसमध्ये कुठे दिसल्या नाहीत. मॉरिशसच्या रहिवाशांचे आपल्या घरावर खूप प्रेम असावे. ज्या देशातील लोक आपल्या घरावर असे जिवापाड प्रेम करतात, त्या देशाला उज्ज्वल भवितव्य असते.

**(साधना, १६ सप्टेंबर २०१७)**

**शब्दार्थ :**
**विस्फोट** - मोठा स्फोट. **कब्जा** - ताबा. **परिक्रमा** - फेरी, प्रदक्षिणा. **अलंकृत** - नटलेला. **जडभारित** - जड झालेला. **लगून** - खाडी. **दिगंतर** - आकाश. **संन्यस्त** - ज्याने संसाराचा त्याग केला आहे अशी व्यक्ती. **भग्न** - पडका. **जिवापाड प्रेम करणे** - खूप प्रेम करणे.

## कृती

**(१) खाली दिलेल्या घटना कालानुक्रमाने लावा.**

| | |
|---|---|
| (अ) मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाले. | (१) ________ |
| (आ) पहिला भारतीय मॉरिशसमध्ये पोहचला. | (२) ________ |
| (इ) मॉरिशसला डच पोहोचले. | (३) ________ |
| (ई) ब्रिटिशांनी फ्रेंचांकडून मॉरिशस बेट जिंकले. | (४) ________ |

**(२) आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ) **मॉरिशस बेटावर वास्तव्य करून गेलेले विविध देशांतील लोक**

(आ) **मॉरिशस बेटावर बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषा**

**(३) उत्तरे लिहा.**

(अ) भारतीय लोक जेथे उतरले तो घाट –

(आ) भारतीय वंशाच्या लोकांचे मॉरिशसमधील प्रमाण –

(इ) घराला भारतीयत्व देणारी गोष्ट –

(ई) मॉरिशसची राजधानी –

(उ) मॉरिशसमध्ये असलेले छोटे बेट –

(ऊ) मॉरिशसच्या घरांचा आकार –

**(४) खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| (१) | शहर | |
| (२) | नदी | |
| (३) | पाऊल | |
| (४) | डोंगर | |

**(५) खालील शब्दांचे लिंग ओळखा व तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | शब्द | लिंग |
|---|---|---|
| (१) | साखरबेट | |
| (२) | होडी | |
| (३) | घुमट | |
| (४) | पृथ्वी | |

**(६) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| (१) प्रतिदिन | ............... |
| (२) स्त्रीपुरुष | ............... |
| (३) यथाशक्ती | ............... |
| (४) भाजीपाला | ............... |
| (५) पापपुण्य | ............... |

**(७) स्वमत.**

(अ) मॉरिशसला बहुरंगी निसर्गसौंदर्य लाभले आहे, याविषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.

(आ) या पाठातील तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका गोष्टीचे वर्णन करा.

**उपक्रम :** आंतरजालाच्या साहाय्याने मॉरिशसविषयी अधिक माहिती लिहा.

***

AS4HGG

## १४. भल्लगडी दादा

**शाहीर कुंदन कांबळे** (१९४७ ते २०१७) :

लोककवी, गीतकार तसेच आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कवी. त्यांचे 'शाहीरी मेवा' हे पुस्तक प्रचंड गाजले आहे. महाराष्ट्रासह, देशभरात त्यांची हिंदी आणि मराठी गीते लोकप्रिय ठरली आहेत.

शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस म्हणजे अत्यंत आनंदाचे दिवस असतात. अशा सुगीच्या दिवसातील शेतकऱ्याच्या मनात उमटणाऱ्या विविध भावभावनांचे वर्णन प्रस्तुत कवितेत कवीने केले आहे.

हे आली रे आली, आली रे आली
सुगी आलीऽऽऽ
मेघराजानं किरपा केली रं
हे भल्लगडी दादा, भल्ल म्हण दादा ।।धृ।।


काळ्या मातीला हिरवा सुगंध
या गंधात सारेच धुंद
नवनवतीचा साज हा ल्याली रे ।।१।।

नटलं घरदार शिवार सारं
खेळं अंगणी सळसळतं वारं
बहुआनंदाने धरती न्हाली रे ।।२।।

दोन हातांची किमया ही सारी
साथीला बैलं माझे खिल्लारी
केली दैवाने दौलत हवाली रे ।।३।।

काय कमतरता कोणाला आज
धनी आम्हीच आमचं हे राजं
सान थोरांची चंगळ उडाली रे ।।४।।

('गीतपुष्पांचा फुलोरा' या संपादित काव्यसंग्रहातून)



**शब्दार्थ :**
**मेघराजा** – पाऊस. **नवनवतीचा साज लेणे** – नव्या नवरीप्रमाणे सजणे. **शिवार** – गावाजवळच्या शेताचा परिसर. **चंगळ** – विपुलता, मजा

## कृती

**(१) कारण शोधा.**

(अ) सुगी आली, कारण .......

(आ) शेतकऱ्याला कमतरता नाही, कारण .......

**(२) कवितेच्या आधारे योग्य शब्द शोधा व चौकटी पूर्ण करा.**

(अ) शेतकऱ्यावर कृपा करणारा – [ ]

(आ) नवनवतीचा साज ल्यालेली – [ ]

(इ) शेतकऱ्याच्या साथीला असणारे – [ ]

(ई) दैवाने दिलेली दौलत – [ ]

**(३) खालील ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(अ) काळ्या मातीला हिरवा सुगंध ____________

(आ) धनी आम्हीच आमचं हे राजं ____________

**(४) खालील ओळींतील अलंकार ओळखा व अलंकाराचे नाव चौकटींत लिहा.**

(अ) पहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा.
कुठे बुडाला पलीकडिल तो 'सोन्याचा गोळा?' [ ]

(आ) जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणुसकीची नाती [ ]

(इ) झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरी उडती!
हिरे, माणके, पाचू, फुटुनी पंखचि गरगरती! [ ]

(ई) नटलं घरदार शिवार सारं
खेळं अंगणी सळसळतं वारं [ ]

**(५) स्वमत.**

(अ) शेतकऱ्याला झालेला आनंद तुमच्या शब्दांत व्यक्त करा.

(आ) सुगीच्या दिवसांतील शेतातील धान्य, फुले, फळे यांचे महत्त्व सांगा.

(इ) कवितेतील 'दौलत' या शब्दाचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

**उपक्रम :** शेतकऱ्याची मुलाखत घेण्यासाठी दहा प्रश्न तयार करा.

ASDII4

***

## ♦ उपयोजित लेखन

### १. पत्रलेखन

पत्रलेखन ही कला आहे. आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना/विचारांचे चांगल्या भाषेत संक्रमण करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

तुम्ही मागील वर्षीही 'पत्रलेखन' या घटकाचा अभ्यास केलेला आहे. ते पत्रलेखन तुम्ही पारंपरिक पद्धतीने करत होतात. आता तुम्ही तंत्रज्ञानयुगात वावरत आहात. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांद्वारे तुमची तंत्रज्ञानाशी गट्टीही झाली आहे.

'फोन'चा वापर वाढल्यानंतर पत्रलेखनाची गरज काहीशी कमी झालेली आहे. असे असले तरी अनौपचारिक पत्रात आपल्या भावना शब्दांत प्रभावीपणे व्यक्त होणे, हे आवश्यक कौशल्य आहे. तसेच औपचारिक पत्रासाठी आपले म्हणणे, विचार, मागणी, तक्रार, विनंती इत्यादी गोष्टी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, हे आवश्यक कौशल्य आहे. आजही पत्रलेखन ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. यापुढे तंत्रज्ञानाधारित लेखनपद्धतीने आपले लेखन कौशल्य प्रकट व्हायला हवे.

पत्रलेखनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. यापुढील काळात तुम्हांला मेल पाठवण्याचे तंत्र अवगत करावे लागणार आहे. म्हणूनच यावर्षी आपण पत्राचे प्रारूप हे नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार लक्षात घेणार आहोत.

**यावर्षी आपण खालील पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.**

**पत्रलेखन**

- **अनौपचारिक**
  - **कौटुंबिक**
    जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीस पाठवले जाणारे पत्र
- **औपचारिक**
  - **मागणी, विनंती**
    कार्यालयीन व व्यावसायिक पत्र

| औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|
| (१) प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा योग्य तो हुद्‌दा लिहिणे.<br>(२) पत्राचा विषय लिहिणे.<br>(३) अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे.<br>(४) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे. | (१) व्यक्तीचा उल्लेख योग्य/नात्याप्रमाणे/सन्मानपूर्वक करणे.<br>(२) व्यक्तीचे क्षेमकुशल विचारणे.<br>(३) भावना प्रभावी शब्दांत मांडणे.<br>(४) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करणे.<br>(५) पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही.<br>(६) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक. |

[**टीप –** पत्राला उत्तर मिळण्यासाठी पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक ठरते. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आवश्यकता नाही. (ई-मेलसाठी पाकीट नसते.)]

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ______

प्रति, ______

माननीय ______ ,

______

विषय : ______

महोदय,

______

मुख्य मजकूर

आपला/आपली

______

पत्ता

______

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## कृती–नमुना १

- रक्तदान शिबिरात नागरिक या नात्याने तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहायचे आहे. त्यासाठी खालील निवेदन वाचा व त्याआधारे पत्राच्या प्रारूपात केवळ मुद्दे योग्य ठिकाणी लिहा.

**_आदर्श विद्यालय, चंद्रपूर_**

ज्येष्ठ नागरिक संघातर्फे

रक्तदान शिबिराचे आयोजन

सर्व नागरिकांना सहभागी होण्याची विनंती.

**स्थळ :** शाळेचे सभागृह

**वेळ :** सकाळी ९ ते सायंकाळी ५

**दिनांक :** १५ ऑगस्ट

## कृती–नमुना २

- वृत्तपत्रातील खालील बातमी वाचा व त्याखालील कृती सोडवा.

वार्ताहराकडून

**'आपले शहर'**

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावरील सिग्नल यंत्रणा नादुरुस्त.

सिग्नल यंत्रणेमधील बिघाडामुळे अपघातांची शक्यता.

रस्त्यावर वाहतूक कोंडी.

जागरूक नागरिक या नात्याने

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावर नवीन सिग्नल यंत्रणा बसवून देण्याची मागणी करणारे पत्र मा. वाहतूक अधिकारी यांना लिहा.

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावरील नादुरुस्त सिग्नल दुरुस्त केल्याबद्दल मा. वाहतूक अधिकारी यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

# २. गद्य आकलन

प्रश्नांची रचना तयार करता येणे, हे महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी 'गद्य आकलन' या घटकाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. इयत्ता नववीमध्ये आपण याचा अभ्यास केला आहे. त्याचे पुन्हा वाचन करा.

दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित पाच प्रश्न तुम्हांला तयार करायचे आहेत. हे पाच प्रश्न असे असावेत, की त्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.

- **प्रश्न**

  (१) तयार केलेला प्रश्न, प्रश्न या स्वरूपात असावा व तो अर्थपूर्ण असावा.

  (२) कोण? कोठे? केव्हा? का? इत्यादी प्रकारच्या प्रश्नांची रचना करण्याचा सराव करावा.

  (३) ज्या प्रश्नांची उत्तरे उताऱ्यात असतील असेच प्रश्न तयार करावेत.

  (४) प्रश्नांची उत्तरे लिहू नयेत.

  (५) प्रश्नाच्या शेवटी प्रश्नचिन्ह देणे आवश्यक आहे.

## गद्य आकलन उतारा

### नमुना-कृती

- **खालील उतारा वाचा व त्याच्या आशयावर पाच प्रश्न तयार करा.**

चांदण्यासारखे फुलांचे घोसच्या घोस कडुनिंबाने माथी माळले आहेत. फांद्या-फांद्यांतून हिरव्याकंच कैऱ्या खाली झेपावण्यासाठी अधीर होऊन लोंबकळत आहेत. तो पाहा पांगारा! भर उन्हात लालीलाल होऊन फुलला आहे वेडा! पण तोच कशाला? हा अशोक काय, नि ही काटेसावरी तरी काय? हा खुरचाफा, हा शिरीष, हा मोगरा, नि ही रातराणी सगळेच कसे रंगात आले आहेत. फुलण्याच्या वेडाने जणू झपाटलेले आहेत. रंग, गंध उधळण्याच्या नादात दंग आहेत.

ही तर झाडेच! पण कशी स्वत:ला उधळून देणारी, झोकून देणारी हातचे राखून न ठेवता मुक्तपणे फुलणारी!

- **गद्य आकलन उतारा नमुना प्रश्न**

  (१) कडुनिंबाच्या फुलांना कशाची उपमा दिली आहे ?

  (२) हिरव्याकंच कैऱ्या कुठून झेपावत आहेत ?

  (३) उताऱ्यामध्ये कोणकोणत्या फुलझाडांची नावे आली आहेत ?

  (४) पांगाऱ्याच्या फुलांचा रंग कोणता ?

  (५) झाडे कशाने झपाटलेली आहेत ?

याशिवाय वेगळे प्रश्न तुम्ही तयार करू शकता.

# ३. जाहिरात लेखन

आजच्या स्पर्धेच्या युगाचा 'जाहिरात' हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या यशस्वितेवर उत्पादनाचा खप, विक्री यांचा आलेख ठरतो, म्हणून एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सृजनशील कला आहे आणि ती आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे.

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्यातील क्रांतीमुळे जाहिरात क्षेत्राची कक्षा अधिक विस्तारते आहे.

लोकांच्या मनात उत्पादनाबाबत आवड निर्माण करणे, त्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा जाहिरातीचा प्रमुख उद्‌देश असतो.

● **जाहिरात लेखन करताना खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

(१) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हे उत्तम जाहिरातीचे सूत्र आहे.
(२) जाहिरातीकडे लक्ष वेधले जाईल अशी लक्षवेधी शब्दरचना असावी.
(३) कशाची जाहिरात आहे हे ठळकपणे व आकर्षकपणे नमूद करावे.
(४) आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर करून जाहिरात अधिक आकर्षक करावी.
(५) जाहिराती तयार करताना समर्पक व लक्षवेधी भाषेला महत्त्व असावे.
(६) ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.
(७) जाहिरातीमधील उत्पादनाची गुणवत्ता महत्त्वाची असते, त्यामुळे सवलतीचा उल्लेख असणे आवश्यक नाही.
(८) जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

✼ **कृतिपत्रिकेमध्ये –** (१) जाहिरात पेनने लिहावी, पेन्सिलचा वापर करू नये.
(२) चित्र काढण्याची आवश्यकता नाही.

**जाहिरात लेखनाच्या मूल्यमापन कृती**

- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्‌धतीने पुनर्लेखन करणे.

या व्यतिरिक्त वेगळ्या सृजनशील पद्‌धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

**आजचे युग जाहिरातीचे युग**

- इंटरनेट
- चित्रपट
- वृत्तपत्रे
- मासिके
- आकाशवाणी
- दूरदर्शन

**जाहिरातींसाठी अनेक माध्यमे**

वस्तूंची मागणी निर्माण करण्याची कला म्हणजे जाहिरात

**जाहिरात तयार करताना लक्षात घ्यायच्या बाबी**

- कंपनीची मुद्रा
- कंपनीचे नाव
- कंपनीचा पत्ता
- मथळा
- उपमथळा
- तपशील

### जाहिरात लेखन नमुना कृती

- **'राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती' या विषयासाठी जाहिरात तयार करा.**



***चला करूया भ्रमंती***

***फुलपाखरांच्या जगात***



**नावनोंदणी आवश्यक**

**त्वरा करा! त्वरा करा! त्वरा करा!**

मोजक्याच जागा शिल्लक

राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती!

घेऊया फुलपाखरांच्या विश्वाचा रोमहर्षक अनुभव

**वयोगट –** १५ ते २०

**कालावधी –** दि.२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर

**संपर्क –** जंगल भ्रमंती संस्था

www.junglebhramanti@gmail.com

- **अधिक अभ्यासासाठी कृती :**

**– खाली दिलेल्या शब्दांवरून जाहिरात तयार करा.**

(१) महाराष्ट्र किल्ले, गडभ्रमंती

(२) दिवाळीची सुट्टी : छंदवर्ग, नाट्यशिबिर.

(३) चित्रकला, चित्रप्रदर्शन

# ४. बातमी लेखन

आजचे युग हे माहितीचे युग आहे. तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरंच जवळ आले आहे. जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून या प्रसार माध्यमांद्वारे सविस्तर कळते. रोजच्या जीवनातील अगदी 'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील' अशा आपल्याशी प्रत्यक्षात संबंधित बातम्यांपासून 'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी' अशा अभिमानास्पद बातम्या आपल्याला कळतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.

थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे) हे आज महत्त्वाचे कौशल्य ठरते.

चिकित्सक, तर्कशुद्ध विचार, माहितीचे यथायोग्य वर्गीकरण, विश्लेषण, सृजनशीलता व लेखन कौशल्य या क्षमता अंगी बाणवणे, हे उत्तम बातमी तयार करण्यासाठी आवश्यक गुण होत.

कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.

(१) घटनेची विश्वासार्हता.
(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.
(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.
(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.
(५) स्वत:च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

- **बातमी तयार करण्याचे निकष :**

(१) शीर्षक – बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.
(२) दिनांक, स्थळ, वेळ, संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
(३) घटना घडण्याच्या स्थितीप्रमाणे बातमीलेखनात काळाचा वापर केला जातो.
(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत.
(५) बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाची घटना नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमीचे क्षेत्र**

सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय, शालेय/शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन, वैद्यकीय, दैनंदिन घटना या घटकांच्यासंदर्भात घडलेल्या घटनांच्या बातम्या तयार होतात.

- **बातमी तयार करणे – मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या विषयावर बातमी तयार करणे.
(२) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.
(३) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.
(४) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

## बातमी लेखन
### नमुना कृती

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
  **'नूतन विद्यालय' चंद्रपूर येथे प्रा. प्रवीण देशमुख यांच्या उपस्थितीत वनमहोत्सवाचा उद्घाटन समारंभ संपन्न.**

आमच्या वार्ताहराकडून | दिनांक : १२ जुलै

### *वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे*

दि. ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता विद्यालयाजवळील तपोवनात वनमहोत्सवाचा उद्घाटन समारंभ पार पडला. वनमहोत्सवाचे उद्घाटन प्रा. प्रवीण देशमुख यांचे हस्ते संपन्न झाले. 'मानवाला धनधान्य, फळे, संपत्ती देणाऱ्या व त्याला सर्वतोपरी मदत करणाऱ्या वृक्षवेलींना आपण सावरले पाहिजे, हे माणसाला कधी कळणार ?' असा भावपूर्ण प्रश्न नूतन विद्यालयाच्या वनमहोत्सव समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलाताना प्रा. प्रवीण देशमुख यांनी विचारला. तपोवनात निळ्या जास्वंदीचे रोप लावून वनमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, वठलेल्या वृक्षाची आत्मकथा इत्यादी विविध स्वरूपाचे कार्यक्रम सादर केले.

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**

  - तलाव ओसंडून वाहू लागले. गावकऱ्यांसाठी आनंदवार्ता.
  - शहरात डेंग्यूचा वाढता फैलाव. म. न. पा. कडून आरोग्य तपासणी.
  - सचिन तेंडुलकरचा वाढदिवस युवा हेल्थ क्लबकडून उत्साहात साजरा.

# ५. कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशीलतेला वाव देणारा विषय आहे.

'कथ्यते इति कथा!' म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. कथा ही पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रूपात मांडली जाऊ शकते. कथाबीजाच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखन कौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारांनाही दिशा मिळते.

- **उत्तम कथालेखनासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

    (१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)
    (२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.
    (३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.
    (४) कथा भूतकाळात लिहावी.
    (५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.
    (६) कथेला ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.
    (७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.
    (८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

    (१) कथाबीजावरून कथालेखन.
    (२) शीर्षकावरून कथालेखन.
    (३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.
    (४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.
        (अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.
        (ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.
    (५) मुद्द्यांवरून कथालेखन.

[**टीप–** कथालेखनासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.]

## कथालेखन

### नमुना कृती

**दिलेल्या कथेचा शेवट वाचा व त्याच्या आधारे कथेची सुरुवात लिहा.**

..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................
................ शेतकरीण आणलेल्या पाण्याचा थेंब नि थेंब जपायची, उपयोगात आणायची. बादलीभर पाण्यात भाजी धुऊन घ्यायची. त्याच पाण्याने घासलेल्या भांड्यांची पहिली राख धुऊन टाकायची, खरकटी भांडी विसळायची, मळकट हात धुवायची, मग बादलीतले पाणी वाफ्यात ओतायची. वाफ्यातल्या भाज्या, फुलझाडे बहरून यायची. हिरवी माया फुलली, भोळ्याभाबड्या शेतकरणीने चतुरपणाने पाण्याचा थेंब नि थेंब जपला होता.

- तुम्ही तयार केलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या.
- ही कथा वर्गात सादर करा.

# ६. लेखन कौशल्य

## निबंध लेखन

स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता/हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंध लेखन या घटकाचा अभ्यास आवश्यक असतो. निबंध लेखन म्हणजे विषयानुरूप केलेली विचारांची मुद्देसूद मांडणी.

यावर्षी आपण वर्णनात्मक आणि आत्मकथनात्मक या निबंध लेखन प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

### (१) वर्णनात्मक–

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र हुबेहूब शब्दांत रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. निरीक्षणशक्ती व लेखनशैलीच्या विकासासाठी वर्णनात्मक लेखन हा घटक महत्त्वाचा आहे.

**वर्णनात्मक लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) वर्णन वास्तव असावे.
(२) अतिशयोक्तीपूर्ण लेखन नसावे.
(३) भाषा सोपी व आकर्षक असावी.
(४) वर्णन चित्रदर्शी (हुबेहूब) व्हावे.

#### नमुना कृती

● **खालील मुद्द्यांच्या आधारे 'मी अनुभवलेला पाऊस' या विषयावर निबंध लिहा.**




### (२) आत्मकथन–

**आत्मकथन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार.
(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोगिता, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.
(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे. (परकाया प्रवेश)
(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.
(५) संपूर्ण लेखन प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत करणे.

#### नमुना कृती

● **दैनंदिनी (डायरी) तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून तिचे आत्मकथन पुढील मुद्द्यांचा उपयोग करून लिहा.**



(१) निर्मिती
(२) महत्त्व
(३) उपयोग
(४) इतरांची भावना
(५) आनंद
(६) खंत

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी आंतरभारती, इयत्ता दहावी (मराठी भाषा)

₹ ४२.००

